
# आमचो छत्तीसगढ



डॉ. नीलिमा थत्ते-केळकर

# आमचो छत्तीसगढ

## एक चित्रमय प्रवास

डॉ. नीलिमा थत्ते-केळकर




**प्रकाशक**
नीलिमा थत्ते
२९, स्वरूप पार्क
कोथरूड, पुणे ४११०३८
फोन– ९८५००९५०९२
इ–मेल – dr.n.thatte@gmail.com



© नीलिमा थत्ते २०२३



■ मूल्य ऐच्छिक

**मुखपृष्ठ व सर्व फोटो**
नीलिमा थत्ते

**प्रकाशचित्र संस्करण**
सतीश पाकणीकर

**अक्षररचना व मांडणी**
सुप्रिया जोगदेव

**मुद्रण**
स्टार कॉपीअर्स

**प्रकाशन तिथी**
गणेश चतुर्थी, १९.०९.२०२३

# आमचो छत्तीसगढ

हे माहितीपर पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान लेखिका व प्रकाशक डॉ. नीलिमा थत्ते-केळकर यांचे आभारी आहे.

आपले अभिप्राय डॉ. नीलिमा थत्ते-केळकर यांना 9850095092 या क्रमांकावर किंवा dr.n.thatte@gmail.com या ईमेलवर कळवावेत ही विनंती.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237
(विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गांव या क्रमांकावर कळवा.)

# आमचो छत्तीसगढ

प्रिय वाचक,

शीर्षक वाचून असं वाटेल की चुकून 'आमचा' ऐवजी 'आमचो' लिहिलं आहे. पण तसं नाही. छत्तीसगढी भाषेत असंच म्हणतात. हे राज्य आपला सख्खा शेजारी असूनही आपल्याला फारशी माहिती नसते. याची जाणीव मला दोन वर्षांपूर्वी झाली. सहल ठरल्यावर चक्क नियमित अभ्यास करून भरपूर माहिती गोळा केली. मग केलेल्या भटकंतीत या अनोळखी प्रदेशाने इतके वेगळे आणि समृद्ध अनुभव दिले, की ते अनेकांना सांगावेत असं वाटलं. फेसबुक आणि विपुलश्री मासिकातील लेखमाला यांतून तसा प्रयत्नही केला. तरीही आणखी लोकांपर्यंत हे पोचवण्याची गरज वाटतच राहिली. म्हणून आता हा पुस्तकाचा खटाटोप.

काय नाही या राज्यात? मानव गुहांमध्ये राहत होता तेव्हापासूनचा इतिहास, उत्खननात सापडलेला पुरातन ठेवा, टेकड्या-दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या-धबधबे-डोंगराच्या पोटातल्या गुहा अशी भौगोलिक वैशिष्ट्ये, हिरवीगार भाताची शेती आणि मोहाची झाडे यांनी नटलेला इथला निसर्ग, त्याच्याशी जोडलेले आदिवासी, त्यांचे गोंदण, त्यांचे नृत्य, त्यांच्या भाबड्या संकल्पना, माती आणि धातूची खास इथली अशी कला, मंदिरे, शिल्पकला, मंदिरांशी संबंधित पुराकथा, रामायण-मेघदूतासारख्या काव्यांशी जुळलेले धागे आणि इडार- चीला- फरा अशा अस्सल इथल्या पाककृती, अशा अनेक गोष्टी! रायपूर, बिलासपूर, रायगड, सरगुजा, दुर्ग, राजनंदगाव, बस्तर असे इथले प्रमुख जिल्हे आहेत.

कवर्धा जिल्ह्यातले भोरमदेव मंदिर म्हणजे छत्तीसगढचे खजुराहो तर चित्रकोटचा धबधबा म्हणजे छोटा नायगारा. मैनपाट म्हणजे इथले सिमला आणि राजिम म्हणजे इथले प्रयाग! तुम्हाला अशा या छत्तीसगढविषयी जाणून घ्यावंसं वाटेल.

शाळेत प्रतिज्ञा पाठ केली होती. त्यात एक वाक्य होतं- माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. या वाक्याचा खरा अर्थ समजून घेण्यासाठी डोळस भटकंती सुरू केली. आसाम, अरुणाचल, ओडिशा, बिहार, गुजरात, तमिळनाडू, कर्नाटक यांच्या भेटीने खूप काही दिले. त्यात आता छत्तीसगढची भर पडली आहे.

वर्तमानपत्रे, मासिके यांतून सदरे, लेखमाला लिहिल्या असल्या तरीही पुस्तकाचा हा माझा पहिलाच प्रयत्न आहे.

हे पुस्तक म्हणजे माहिती पत्रक नाही. पर्यटनविषयक इतर पुस्तकांसारखी ठराविक मांडणीही नाही किंवा हे परिपूर्ण आहे असा दावाही नाही. छत्तीसगढ मला जसं दिसलं तसं तुम्हाला दाखवायचं आहे इतकंच.. या पुस्तकासाठी काहीही मूल्य ठरवलेलं नाही.. कारण मला दिसलेला तिथला निसर्ग, तिथली कला, तिथल्या लोकांचं जीवन यांचं मोल कसं करणार? हे सगळं अनुभवतांना मला जसा आनंद मिळाला तसा तुम्हालाही मिळावा एवढीच इच्छा आहे.

**डॉ. नीलिमा थत्ते-केळकर**

◆◆◆



छत्तीसगढचे पारंपरिक पदार्थ


फरा


मूग वडे

**व्यवस्थित आखणी करून**
**फिरण्याची गोडी ज्यांच्यामुळे लागली,**
**त्या माझ्या बाबांना अर्पण...**

## यांची आठवण ठेवायलाच हवी

सहलीची आयोजिका मृणाल जोशी
goaroound@gmail.com

माझ्या भटकंतीबद्दल मला लिहितं करणारी मैत्रीण माधुरी वैद्य-संपादिका, विपुलश्री

मी हे पुस्तक लिहावं असा हट्ट धरून पाठपुरावा करणारे सुहृद- श्रीकांत फाटक, शिल्पा अभिराम, नितीन भिडे इ

मी काढलेल्या प्रकाशचित्रांना छपाईयोग्य बनवण्यासाठी जादूची कांडी फिरवणारा बालमित्र सतीश पाकणीकर - सुप्रसिद्ध प्रकाशचित्रकार

पक्षी, फुलपाखरं, वनस्पती, इतिहास, मंदिरं, मूर्ती अशा अनेक विषयांचे ज्ञानकण मी ज्यांच्याकडून वेचले ते माझे सर्व गुरुजन

# अनुक्रमणिका


१. चलो छत्तीसगढ ................................ ८
२. भोरमदेव मंदिर................................ १०
३. मडवा महल.................................... १४
४. छेरकी महल .................................. १६
५. भोरमदेव जंगल रीट्रीट ........................... १८
६. संग्रामग्राम .................................... २२
७. देवरानी-जेठानी मंदिरे............................ २४
८. मडकू द्वीप .................................... २८
९. मल्हार ...................................... ३०
१०. पाताळेश्वर .................................... ३४
११. लक्ष्मण मंदिर .................................. ३६
१२. तीवरदेव महाविहार .............................. ४०
१३. श्रीपुर ....................................... ४४
१४. सुरंग टीला .................................... ४८
१५. गोष्ट राजिम तेलीणीची ........................... ५०
१६. राजीव लोचन मंदिर ............................. ५२
१७. पाषाण चित्रे ................................... ५६
१८. केशकाल व्हॅली ................................. ५८
१९. झिटकू- मिटकी ................................ ६०
२०. कलाग्राम कोंडागाव .............................. ६२
२१. मांदरकोट गुहा ................................. ६४
२२. बस्तर ....................................... ६८
२३. अबब धबधबे .................................. ७२
२४. माडिया नृत्य ................................... ७६
२५. बाणासुराचं गाव ................................. ७८
२६. चंद्रादित्य मंदिर ................................. ८०
२७. गमवाडा ..................................... ८२
२८. रायपूर ...................................... ८४
२९. महामाया मंदिर ................................. ८६
३०. कलचुरी किल्ला ................................. ८८
३१. रामगढ आणि मेघदूत ............................. ९०
३२. कौसल्या मंदिर ................................. ९४
३३. दंडकारण्य .................................... ९८
३४. अजब गजब मैनपाट ............................. १०२
३५. मैनपाटचे तिबेटी ................................ १०६
३६. अमरकंटक आणि सांगता ........................... १०८

# छत्तीसगढ नकाशा


CHHATTISGARH
DISTRICT MAP
INDIA
N
UTTAR PRADESH
JHARKHAND
MADHYA PRADESH
MAHARASHTRA
ODISHA
TELANGANA
ANDHRA PRADESH
Bay of Bengal
KOREA
Baikunthpur
SURAJPUR
Surajpur
Balrampur
BALRAMPUR
Ambikapur
SURGUJA
JASHPUR
Jashpur Nagar
BILASPUR
Bilaspur
KORBA
Korba
MUNGELI
Mungeli
RAIGARH
Raigarh
Kawardha
KABEERDHAM
Janjgir
JANJGIR-CHAMPA
Bemetara
BEMETARA
Baloda Bazar
BALODA BAZAR
RAIPUR
Raipur
DURG
Durg
RAJNANDGAON
Rajnandgaon
MAHASAMUND
Mahasamund
BALOD
Balod
Dhamtari
DHAMTARI
Gariaband
GARIABAND
Kanker
KANKER
KONDAGAON
Kondagaon
Narayanpur
NARAYANPUR
Jagdalpur
BASTAR
BIJAPUR
Bijapur
Dantewada
DANTEWADA
Sukma
SUKMA
LEGEND
State Boundary
District Boundary
State Capital
District Headquarter
Map not to Scale
Copyright © 2019 www.mapsofindia.com

# १. चलो छत्तीसगढ 

ही सहल करून बरोब्बर दोन वर्षं झाली. २१ सप्टेंबर २०२१ ला सुरुवात केली. पहिले काही दिवस गटासह आणि नंतर एकटीने अशी १३ दिवस हिंडले. पुणे–मुंबई गाडीने आणि मग मुंबई–रायपूर विमानाने असा प्रवास करून थोडं ताजंतवानं होऊन लगेच पुढे निघालो. प्रत्यक्ष वर्णन सुरू करण्यापूर्वी जरा छत्तीसगढची ओळख करून घ्यायला हवी.

नावात काय आहे असं जरी शेक्सपिअरचं म्हणणं असलं, तरी एखाद्या गावाच्या किंवा प्रदेशाच्या नावावरून खूप गोष्टी समजतात– इतिहास ,भूगोल, भाषा, लोक असं बरंच काही.

छत्तीसगढ हे नाव का तर इथे छोटे मोठे छत्तीस गड किंवा किल्ले होते म्हणून. आजही राम, लक्ष्मण, सारंग, मनेंद्र, अनंत अशा नावाचे गढ इथे आहेत. याचा उत्तर भाग महाकोसल किंवा दक्षिण कोसल म्हणून तर दक्षिण भाग दण्डकारण्य किंवा महाकान्तार म्हणून ओळखला जात होता. ईक्ष्वाकु घराण्यापासून सुरू होत मौर्य, सातवाहन, गुप्त, वाकाटक, नळ, शरभपुरिय, पांडव, बाण, कलचुरी, नाग अशा अनेक घराण्यांनी राज्य केले. गंमत म्हणजे १७४१–१८४५ अशी एकशे चार वर्षे नागपूरकर भोसल्यांची सत्ता होती हे मला माहितच नव्हतं.

आधी हे राज्य म्हणजे मध्यप्रदेशचाच एक भाग होता. पण छत्तीसगढ निर्माण मंचाने १९९० पासून केलेले प्रयत्न आणि सर्व राजकीय पक्षांचा सहभाग यांमुळे १ नोव्हेंबर २००० पासून याला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळाला. रायपूर, बिलासपूर, रायगढ, सरगुजा, दुर्ग, राजनंदगाव आणि बस्तर हे याचे प्रमुख जिल्हे आहेत.२०२० आणि २०२१ अशी लागोपाठ दोन वर्षे या राज्याला स्वच्छ राज्य पुरस्कार मिळाला आहे. चला तर मग !

पहिला मुक्काम भोरमदेव जंगल रीट्रीट !

सामान ठेवून किल्ल्या ताब्यात घेतल्या आणि थेट नदीवर गेलो. नदीकाठी नव्हे तर चक्क नदीतच जेवण्यासाठी ! या सकरी नदीचं पात्र उथळ असल्याने पाण्यातून चालत जाऊन मधे मांडलेल्या खाटांवर विराजमान झालो.पाण्यात बसून, पाण्यात पाय बुडवून जेवायला फार भन्नाट वाटलं ! त्याच वेळी काठावर फुलपाखरांचंही जेवण चाललं होतं. नर फुलपाखरं समूहाने मातीतून क्षार शोषण्याचा उद्योग करतात– मड पडलिंग (Mud puddling) म्हणतात. मस्त फोटो मिळाला त्यांचा.

◆◆◆



**फुलपाखरांचे क्षार–सेवन** (mud-puddling)





**सकरी नदीमध्ये जेवण**

**सकरी नदी**



# २. भोरमदेव मंदिर

सकरी नदीतल्या जेवणाचा अनुभव घेऊन भोरमदेव मंदिर बघायचं ठरवलं. गोंड भाषेत शंकराला भोरमदेव म्हणतात. हे मंदिर कवर्धा जिल्ह्यात आहे. कबीरधाम वरून कवर्धा झालं असावं. इथे पूर्वी गोंड राज्य होतं. अर्थात हे मंदिर नंतर फणिनाग वंशातल्या लक्ष्मणदेवराय व गोपालदेवराय या राजांच्या काळात निर्माण झालं (इ.स. आठव्या–नवव्या शतकात) मंदिर पाच फूट उंच आणि चोवीसशे चौरस फूट जोत्यावर आहे. या पूर्वाभिमुख दगडी मंदिरावर देवता काळ्या तर इतर शिल्पे पिवळ्या दगडांत कोरलेली आहेत. पूर्व, उत्तर, दक्षिण अशी तीन प्रवेशद्वारे आहेत. चार खांबांवर मंडप, मग अंतराळ आणि शेवटी चौरस गर्भगृह. शिवमंदिर असूनही द्वारशाखेवर दशावतार तर आत शिवलिंग, गरूडारूढ विष्णू–लक्ष्मी आणि राजाराणीची शिल्पे आहेत. बाह्यभागावर खाली हत्तीं–सिंह यांच्या ओळी तर वरती महिषासुर मर्दिनी, चामुंडा, नृत्य गणेश, वामन, सूर्य, अंधकासुर वध करणारा शिव अशी शिल्पं आहेत. बाह्यभागावरील कामशिल्पांमुळे याला 'छत्तीसगढचे खजुराहो' म्हणतात. याचं शिखर वैशिष्ट्यपूर्ण आहे. नागरशैलीचाच एक प्रकार असलेल्या गुरूर शैलीत आहे असं समजलं जातं. भोरमदेव मंदिराच्या आवारातच एक भग्न मंदिर (२–३रे शतक) आणि एक नंतरच्या काळातले हनुमान मंदिरही आहे. तिथे मिळालेल्या अवशेषांचे एक छोटे संग्रहालयही आहे. जवळच असलेल्या तलावामुळे मंदिराचा परिसर अतिशय रम्य आहे.

◆◆◆



**मंदिराजवळचे तळे**



मंदिराकडे जाताना



भोरमदेव मंदिर



काम-शिल्पे



वादक-नर्तक



चामुंडा



नंदी व प्रसादधारी गण



नृत्यगणेश



महिषासुर मर्दिनी



लकुलीश



मुरलीधर



शिव अंधकासुर वध



बसलेला सूर्य



मारुती



हरिहर



वामनावतार

# ३. मडवा महल

भोरमदेव मंदिर समूहात मडवा महल आणि छेरकी महल ही आणखी दोन मंदिरे येतात.

मडवा महलला दूल्हादेव मंदिर असंही नाव आहे. इ.स. १३४९ मधील शिलालेखानुसार नागवंशी राजा रामचंद्रदेव आणि हैहय राजकुमारी अंबिकादेवी यांच्या विवाहानिमित्त हे मंदिर उभारले गेले. मडवा म्हणजे मांडव, म्हणजे हा खरोखरच लग्नाचा मांडव होता. वैवाहिक जीवनात पाऊल ठेवतांना आवश्यक अशी कामजीवनाची ओळख करून देणारी पन्नासहून अधिक कामशिल्पे बाह्य भिंतीवर आहेत– अतिशय सुस्पष्ट आणि तथाकथित सुसंस्कृत मनाला काहीशी धक्का देणारी. लेखावरून असेही कळते की नाग घराण्याने पाचशे वर्षे राज्य केले. पहिला राजा अहिराज आणि चोविसावा रामचंद्र.

मंदिराचा गाभारा जमिनीच्या बराच खाली आहे. आत मोठे शिवलिंग आहे. दारात दोन्ही बाजूला द्वारपाल, सेवकसेविका आणि नदीदेवता आहेत. इथे गंगा यमुना न म्हणता फक्त नदीदेवता असंच म्हणतात. त्यांच्या हातात कलश आहेत. मंदिर पश्चिमाभिमुख आहे.

आवारात काही सतीशिळा,वीरशिळा विखुरलेल्या दिसल्या. एक वीर आणि दोन पत्नी असं एका शिळेवर शिल्पांकन दिसलं.

◆◆◆

मडवा महल





मडवा महल–१६ खांबांचा मंडप



गर्भगृहाच्या डावीकडील बाजू



गर्भगृहाच्या उजवीकडील बाजू



काम–शिल्पे, मडवा महल



सती शिळा

वीर शिळा



# ४. छेरकी महल



छेरकी महल आमच्या रहाण्याच्या जागेपासून अगदी चालत जाण्याच्या अंतरावर होता. साधारणपणे भोरमदेव आणि मडवा महलच्या मध्ये. ही तीनही मंदिरे चौरा (पूर्वीचे चवरापुर) गावात आहेत. हे लहान मंदिर म्हणजे फक्त गर्भगृह नि शिखर आहे, मंडप नाही.

स्थानिक भाषेत छेरी म्हणजे शेळी, छेरकी म्हणजे शेळ्या चारणारा. खास या लोकांसाठी हे मंदिर चौदाव्या शतकात फणि ऩागवंशाच्या राजाने बांधले असे समजतात. या भागात ते शेळ्या चारायला आणत असत. मंदिराला दरवाजा नसल्याने थेट आत शेळ्या बांधत म्हणून हे नाव पडले असेही म्हणतात. आजही मंदिरात शेळ्यांचा वास येतो अशी समजूत आहे. अर्थात मी पाहिले तेव्हा आत उंदराच्या किंवा वटवाघळाच्या लेंड्यांसारख्या भरपूर लेंड्या दिसल्या. त्यामुळेच तसा वास येत असणार.

मंदिर पूर्वाभिमुख असल्याने सकाळी सूर्यकिरण थेट शिवलिंगावर पडले होते. उत्तरेची गणेशमूर्तीही उजळून निघाली होती. लता-लता-स्तंभ-लता-पद्म अशी पाचपदरी द्वारशाखाही सुरेख दिसत होती. ललाटबिंबावर गजलक्ष्मी आणि बाजूला गणपती व अर्धनारीश्वर. खाली दोन्ही बाजूंना द्वारपाल,नदीदेवता व सेवक. याशिवाय कोठेही कोरीवकाम नाही. आवारात शिवपार्वतीचे एक भग्न शिल्प केवळ त्यांच्या वृषभ आणि सिंह या वाहनांमुळे ओळखू येत होते. शिखराच्या मागच्या बाजूवर नृत्यमग्न स्त्रीचे एकमेव शिल्प दिसले.!

◆◆◆



छेरकी महल



पाच पदरी द्वारशाखा



गाभाऱ्यातील चतुर्भुज गणपती



सूर्यकिरणांनी उजळलेले शिवलिंग



आवारातील भग्नशिल्प



मागील बाजूस एकमेव शिल्प– नर्तकी

# ५. भोरमदेव जंगल रिट्रीट



भोरमदेव जंगल रिट्रीटचे वास्तव्य हा एक खूप सुंदर अनुभव होता. हिरवागार रम्य परिसर, छोट्या कौलारू घरांसारखे निवास आणि मुख्य म्हणजे दीप्ती-सनी उपाध्याय सारखे उत्साही हसतमुख यजमान पतीपत्नी ! संध्याकाळी खास गोंड व मारार कलाकारांचा नृत्याचा कार्यक्रम होता. अतिशय वेगवान तरीही लयबध्द नृत्य. त्यांच्या सोबत नाचण्याचा थोडासा प्रयत्न केला आणि मग त्यांच्या लाकडी हत्तीभोवती फेर धरून चक्क भोंडल्याची गाणी म्हटली. रात्रीच्या शांततेत स्थानिक तरुणांकडून सुरेख गझलांचा आनंद घेतला. वातावरण निर्मितीसाठी दीप्तीने दिलेली महुआही थोडी चाखून पाहिली.

सकाळी गावात एक चक्कर मारली - हिरवीगार भाताची शेतं, कुंपणावर लटकणारी केशरी जंगली तोंडली बघत आणि इवल्याशा ठिपकेवाल्या मुनियांचा चिवचिवाट ऐकत ! कळलावीची झुडपं, बागडणारी फुलपाखरं, झाडांवरची लाल मुंग्यांची घरटीही पाहिली. या मुंग्या रेशमासारखे धागे वापरून चक्क पानं शिवतात. आदिवासी खातात या. पिहरी नावाचे मश्रूमही खातात.



लाल मुंग्यांचे घरटे

भन्नाट केशरचना




वाटेत एक मुलगा भेटला, त्याने केस असले भारी कापले होते की फोटो घेतलाच. मला रघुवंशातला राम, उत्तररामचरितातले लवकुश आणि सातवाहनांच्या नाण्यावरचा



यज्ञश्री सातकर्णी आठवले, त्यांची काकपक्ष केशरचना आठवली !

परतल्यावर मी दीप्तीला तिच्या हातावरील गोंदणाचा अर्थ विचारला.आडवी रेघ भूमीची,त्यावर उभे शेत,मग आडव्या रेघांच्या दोन जोड्या म्हणजे लाल पांढऱ्या शंखचूड बांगड्या,मधले गोल ठिपके म्हणजे कापलेल्या भाताचे बंधून ठेवलेले गठ्ठे.




त्यावरची आकृती मासे पकडण्याच्या टोपलीची-हवं तेवढं नि तितकंच मिळतं हे सांगणारी आणि गरज व हाव यातला फरक समजावणारी. नंतर जमिनीत जाणारी मुळं सांगतात की आपण मोठे झालो तरी पाय घट्ट रोवलेले हवेत. सगळ्यात वरची खूण अग्नीची-जीवनाचा, सर्व सृष्टीचा आधार असा अग्नी सर्वोच्च स्थानी !!

वरवर साधं वाटणारं गोंदण किती अर्थगर्भ आहे हे जाणवलं आणि ही सहल खूप वेगळी ठरणार याची खात्री पटली....

◆◆◆



ठिपकेवाली मुनिया



पिहरी मश्रुम



रिसॉर्टकडे जाताना



रिसॉर्टमधील निवास







आदीवासी वादक आणि नर्तक



ग्लासी टायगर फुलपाखरू



कळलावी



दीप्ती–सनी उपाध्याय आणि सहकारी

# ६. संग्रामग्राम



ताल किंवा ताला हे बिलासपुर जिल्ह्यातलं एक छोटंसं गाव. मेकलचे पंडुवंशीय राजे इथे होते. त्यांच्या ताम्रपटांत आणि शिलालेखांत याचं संग्रामग्राम हे नाव आहे. कारण इथे मणियारी (मण्यार) व शिवनाथ या नद्यांचा संगम आहे. इ.स. सातव्या–आठव्या शतकापासूनच्या ऐतिहासिक ठेव्याचा शोध सर अलेक्झांडर कनिंगहॅम आणि त्यांचे सहाय्यक वेलगर यांनी लावला.

मला इथला रुद्रशिव बघण्याची उत्सुकता होती. शंकराचं पशुपती हे नाव सार्थ करणारं रूप इथे दिसतं. जवळजवळ नऊ फूट उंचीची मूर्ती आहे. जाळीच्या दरवाज्याआड कुलुपबंद करून ठेवलेली होती. पण आम्हाला अभ्यासासाठी फोटो हवेत हे पटवून दिल्यावर सुरक्षारक्षकाने पाच मिनिटांसाठी दरवाजा उघडला.

या मूर्तीचे सर्व अवयव पशुपक्ष्यांनी बनलेले आहेत. डोक्यावर नागांचा जटाजूट, नाकाच्या जागी सरडा किंवा पाल, डोळे म्हणजे उघडे तोंड आणि बुब्बुळांच्या जागी गोल अंडी किंवा लाडू ! कान म्हणजे पिसारा फुलवलेले मोर, मिशीसाठी मासे, तर खालचा ओठ व हनुवटी म्हणजे चक्क मोठा खेकडा !

खांद्याजवळ मकर व बाहूंवर हत्तीची सोंड आहे. दोन्ही हातांची बोटे म्हणजे सर्पाची तोंडे असल्याने तळवे पाच फण्यांच्या नागासारखे दिसतात. खाली पायांवरही सर्प वेढून आहेत. लिंगाच्या जागी कासवाची मान व तोंड आहेत. पावले मात्र भग्न असल्याने तिथे कोणते प्राणी होते ते उलगडत नाही.

छातीवर दोन व पोटावर एक अशी तीन पुरुषमुखे तर मांड्यांवर पुढे दोन स्त्री मुखे व कडेला दोन हसरे चेहरे आहेत. याशिवाय गुडघ्यापाशी दोन सिंहमुखे आहेत.
अखंड एका पाषाणातून साकारलेला हा शिव बटबटीत आणि रौद्र वाटला तरी पहात रहावासा वाटतो. का घडवला असेल असा, शिल्पकाराला नेमके काय सांगायचे आहे हे कोडे अजूनही पूर्णपणे उलगडलेले नाही. किंवा याला शिवच का म्हणायचं याविषयी मतभिन्नता आहे. पण हा सर्व प्राणिमात्रांचा स्वामी आणि त्यांनीच बनलेला म्हणून ज्येष्ठ पुरातत्वज्ञ आदरणीय देगलूरकर सरांनी याला सर्वभूतवहितृ असे नाव दिले आहे. एकूणच छत्तीसगढ मधे शैव पंथाचा आणि त्यातही तांत्रिकपूजेचा प्रभाव असल्याने असे शिल्प निर्माण झाले असावे..

◆◆◆



प्राणीयुक्त मुख



रुद्रशिव




व्याघ्रमुख व सर्पफणा

# ७. देवरानी- जेठानी मंदिरे



रुद्रशिवाच्या दोन्ही बाजूंना दोन पडकी मंदिरे आहेत. देवरानी-जेठानी मंदिरे म्हणून ओळखली जातात. शरभपुरिय राजघराण्यातल्या दोन राण्यांनी बांधली असं मानतात. रुद्रशिवाशेजारी बाहेरच मेषमुखी मानव आहे. जैन देवता नेगमेष की अग्नीचे नेगमेय रूप की नुसता मेषमुखी गण याविषयी संभ्रम आहे.


नेगमेय की नेगमेष ?

देवरानी मंदिराची द्वारशाखा सुरेख आहे. द्वारशाखा म्हणजे मंदिरांच्या किंवा गाभाऱ्याच्या चौकटी. तीन, पाच, सात, नऊ अशा विषम पदरी असतात. त्यांत पानेफुले, प्राणी, कमळं, रत्नं, वादक-नर्तक, प्रेमी युगुलं असे अनेक प्रकार असतात. ही द्वारशाखा मात्र वेगळी होती. सगळे पदर पानाफुलांचेच आहेत. वेल वर चढत जातांना जसे तिरके समांतर वेढे दिसतात, तशी नक्षी. एका भग्न खांबावरही तसंच कोरीवकाम दिसलं. ललाटपट्टीच्या खालच्या बाजूला यावर कमळ कोरलेलं आहे असं वाटलंड़, पण जवळ गेल्यावर कळलं की १५ मनुष्याकृतींचं चक्र आहे. एकमेकांच्या मागे एक पाय मुडपून बसलेली माणसं होती आणि प्रत्येकाचा उजवा हात पुढच्याच्या खांद्यावर ठेवलेला होता. असं मी पहिल्यांदाच पाहिलं. एरवी सोळा-बत्तीस-चौसष्ट पाकळ्यांचं कमळ किंवा मत्स्य चक्र असतं.

जेठानी मंदिर तर पार उध्वस्त स्थितीत आहे. चौतीस वर्षांपूर्वी जसं सापडलं तसंच ठेवलं आहे. वर पत्र्याची मोठी शेड उभारलेली आहे. अवशेषांमधे एक मोठा हत्ती तेवढा उठून दिसतो.

जागेवरच एक छोटे संग्रहालयही आहे. यक्ष, साधू, द्वारपाल अशी काही शिल्पे आहेत. कुणाचं नुसतंच पाऊल किंवा मोठं डोकं बघून वाईट वाटतं. पण आपल्या देशात असा खजिना इतका ठायीठायी विखुरलेला आहे की तो सगळा जतन करणं खूप अवघड आहे.

◆◆◆



मंदिराचे भग्नावशेष



कमळ



कोरीव स्तंभ



मनुष्याकृतींचे चक्र



साधू



जेठानी मंदिराचा
हत्ती



कोरीव द्वारशाखा



शिर



तळवा



पावले

# ८. मडकू द्वीप



शिवनाथ नदीत एक छोटं बेट आहे - मडकू द्वीप म्हणतात. मुंडकोपनिषद लिहिणाऱ्या ऋषींची ही तपोभूमी. बेटावर त्यांचा पुतळा उभारून मांडुक्य ऋषी असा फलकही लावलेला आहे. या बेटाला केदारतीर्थ किंवा हरिहरक्षेत्र केदार म्हणूनही ओळखतात.

डॉक्टर अरुण शर्मांच्या नेतृत्वाखाली दहा वर्षांपूर्वी इथे उत्खनन झालं. छोटी छोटी एकोणीस मंदिरं सापडली. प्रागैतिहासिक मानवाची दगडी हत्यारे, काही राजांची नाणीही मिळाली. ब्राह्मी व शंख लिपीतले दोन लेखही मिळाले. डॉक्टर शर्मांच्या मते मंदिरे कलचुरींच्या काळातली (दहावे-अकरावे शतक) असावीत.

साध्या वल्ह्याच्या होडीतून तिथे जाता आलं. सुंदर, हिरवंगार बेट आहे. शिवनाथच्या नितळ पाण्यामुळे नेत्रसुखद अनुभव येतो.

स्थानिक लोक पिकनिकसाठीही इथे येतात. जुन्या मंदिरांबरोबर हनुमान, राधाकृष्ण यांची आधुनिक मंदिरेही इथे आहेत.

सापडलेली मंदिरे पुन्हा नीट रचून एका ओळीत जतन करून ठेवली आहेत. वर पत्र्याची व्यवस्थित शेड केली आहे. मधले एक सोडून सर्व पूर्वाभिमुख आहेत. काही मंदिरांत नेहेमीची शिवलिंगे होती तर काहींमधे स्मार्त लिंगे हा वेगळाच प्रकार होता. चार उंचवटे आणि मध्यभागी फुलासारखा आकार अशी पंचायतनाचे प्रतिनिधित्व करणारी रचना !

उमामहेश, गरुडारूढ विष्णुलक्ष्मी यांबरोबरच उपासना करणाऱ्या राजाचेही शिल्प आहे. गंमत म्हणजे विष्णुलक्ष्मी बरोबर अभिषेक करणारा हत्तीही आहे. एकंदरीत सगळी ओबडधोबड आहेत, सुबकता वा नाजूकपणा नाही.

नूतनीकरण केलेल्या मंदिरात नृत्यगणेशाची मूर्ती आहे, पण दुर्दैवाने रंगाऱ्याने मंदिराबरोबर तिलाही तैलरंग फासला आहे. हरिहराची एक जुनी मूर्ती नवीन मंदिरात प्रस्थापित केली आहे.

◆◆◆

**शिवनाथ नदी, मडकू द्वीप**





उत्खनित मंदिरे



रतनपूरचा राजा



उमा महेश्वर



एकमेव पश्चिमाभिमुख मंदिर



मांडुक्य ऋषी



स्मार्त लिंग



नृत्यगणेश



गरुडारूढ
विष्णू-लक्ष्मी

# ९. मल्हार



मडकू द्वीप पाहून मल्हार गाव गाठलं. ताल आणि मल्हार दोन्ही संगीताशी संबंधित, पण शिल्पांशी तशी सांगड नाही. मुळात मल्लार, मल्लारि असं नाव असावं. कोरीव लेखांमधे मल्लालपत्तन असा उल्लेख आहे.

रामायणाशी याचा संबंध जोडला जातो. रामानंतर लवाला उत्तर तर कुशाला दक्षिण कोसल अशी राज्याची विभागणी झाली. कुशस्थलिपुर ही कुशाची राजधानी म्हणजेच आजचं मल्हार गाव अशी समजूत आहे.

इथे सहाव्या-सातव्या शतकातलं भीमकीचक मंदिर आहे. दोन भव्य पुतळे इथे सापडले त्यामुळे हे नाव पडले असावे. कारण कीचकवधाच्या कथेशी काहीच संबंध नाही. किंवा भारवाहक यक्षांना कीचक म्हणतात, म्हणूनही तसं नाव असेल. हे भग्न शिवमंदिर देऊर या नावानेही ओळखलं जातं.

शिखराचा पत्ता नाही. प्रवेशद्वार मात्र खूप छान आहे. गंगा, यमुना, द्वारपाल, सुरेख ! शिव-पार्वतीच्या जीवनातले प्रसंग कोरलेले आहेत. चतुर्भुज भारवाहक पाहून मला एक भन्नाट कल्पना सुचली. जणू काही त्याचे पाय दुखत आहेत भार वाहून, म्हणून त्याने आणखी दोन हात वापरले भार उचलायला. पायाभोवती पट्टा आवळला आणि वाडगा घेऊन आता लेप लावणार आहे गुडघ्याला !!

बाह्य भिंतीवर राजा-राणी, सिंह, गरुडारूढ विष्णू अशीही शिल्पे आहेत. मधूनच चैत्य गवाक्षांची नक्षी डोकावते. एकच तोंड पण दोन शरीरे असे हत्ती-सिंह व त्यावर स्वार वीर फारच छान !आत शिवलिंग आहे आणि बाजूच्या भिंतींवर लेखही कोरलेले दिसतात. पण लिपी येत नसल्याने वाचता आले नाहीत.

◆◆◆



**भीम कीचक मंदिराचे प्रवेशद्वार**



भीम कीचक मंदिर



टू इन वन



द्वारशाखा





चैत्य कमानी


गंगा


यमुना


शिवपार्वती परिवार


शिवपार्वती विवाह



गरुडारूढ विष्णू



मंदिराच्या आवारातील भग्नावषेश



चतुर्भुज भारवाहक

# १०. पाताळेश्वर



मल्हारला शंकराचं अजून एक मंदिर आहे. बहुतांशी शिवमंदिरांप्रमाणे इथेही गर्भगृहाच्या पायऱ्या उतरून गेल्यावर खाली शिवलिंग आहे. त्यामुळेच याचं नाव 'पाताळेश्वर' !

या मंदिरालाही शिखर नाही, फक्त मंडप आणि गर्भगृह...पण महत्त्वाची बाब म्हणजे वर पत्र्याचा आडोसा उभारून शिल्लक भागाचे रक्षण केले आहे. देऊर मंदिराप्रमाणे याचेही प्रवेशद्वार खूप छान आहे. गंगा,यमुना आणि द्वारपालही तसेच सुरेख ! इथे गंगायमुनांची ढब नि लकब वेगळी आहे. त्यांना मुकुट आहे. द्वारशाखेच्या जवळ असलेल्या छोट्या पायरीच्या तळात हत्तींची सुबक रांग आहे. द्वारशाखेच्या तळातही हत्ती आहेत, शिवाय नागदंपतीही आहेत.

भिंतींवर शिवपरिवारासंबंधी शिल्पे आहेत. त्यात प्रणयमग्न गणपतीचे वेगळेच दर्शन झाले. आत शिवलिंगावर गाईच्या तोंडासारखा आकार असल्याने 'गोमुखी' शिवलिंग म्हणतात.

इथे सापडलेली काही शिल्पे इथल्या छोट्याशा संग्रहालयात ठेवली आहेत. त्यांचे फोटो घेण्यास परवानगी नव्हती. त्यात बौद्ध, जैन धर्मातली सुद्धा शिल्पे आहेत. त्यावरून सर्व पंथांचे लोक होते आणि वेगवेगळ्या उपासनेचे स्वातंत्र्य होते हे लक्षात येते. आवारात उघड्यावरच पंचमुखी गणेशाचे भव्य शिल्प आहे. पण त्याची अवस्था फारच वाईट आहे.

दुसरा जाजल्लदेव या राजाच्या काळात ११६७-६८ च्या सुमारास सोमराज नावाच्या ब्राह्मणाने हे मंदिर बांधले. राजाश्रयाने अनेक मंदिरे निर्माण होतात, पण सामान्य माणसाने पुढाकार घेऊन बांधलेले हे मंदिर निश्चितच वेगळे- सहलीतला वेगळेपणा सतत जाणवून देणारे....

◆◆◆





शिवलिंगावरील गोमुख

पाताळेश्वर मंदिराची द्वारशाखा



पायरीवरील हत्तींची रांग



हत्ती व नागदंपती



प्रेमळ गणपती

# ११. लक्ष्मण मंदिर



रायपुर जवळ महानदीच्या किनाऱ्यावर सिरपुर आहे. याचं मूळ नाव श्रीपुर ! या नावाप्रमाणेच आहे याचा भूतकाळ– समृद्ध आणि वैभवशाली ! दहा चौरस किलोमीटर परिसरात विखुरलेले अवशेष याची साक्ष देतात. शरभपुरिय घराण्याच्या सुदेवराजने श्रीपुर वसवलं खरं, पण राजधानीचा मान मात्र महाशिवगुप्त बालार्जुनच्या काळात (इ.स. ५९५–६५५) मिळाला. बालार्जुन हा कोसलच्या पांडु घराण्याचा सर्वात प्रभावशाली राजा होता.

इथलं लक्ष्मण मंदिर बघण्यासारखं आहे. बालार्जुनची आई वासटा हिने आपल्या पतीच्या (महाराज हर्षगुप्त) स्मरणार्थ इ.स. ६२५–६५० च्या दरम्यान हे निर्माण केलं.

खरं तर हे विष्णूचं मंदिर होतं आणि तसा पुरावा पुराभिलेखात मिळतो. 'राजमाता वासटाने हरिचे वैकुण्ठासमान मंदिर उभारले. दुरुस्ती देखभालीसाठी सेवक आणि पाच गावे दान दिली.' या लेखात पुढे विष्णूच्या त्रिविक्रम आणि नृसिंह रूपांची स्तुती आहे. राजाची तुलना कृष्ण व कल्की अवतारांशी करून त्याला कल्की नारायण असे म्हटले आहे.

मंदिराचं अधिष्ठान थोडं उंचावर आहे. पायऱ्यांचे दगड हलू नयेत म्हणून दोन दगड जोडणाऱ्या आडव्या लोखंडी पट्ट्या ठोकलेल्या आहेत. पाया दगडी असला तरी मंदिर मात्र विटांचं आहे. 'पत्र–रत्न–मिथुन–पुन्हा पत्र–दशावतार' अशी पाच पदरी



लक्ष्मण मंदिर



द्वारशाखा



शिखरावरील बंद् कवाड



कमानीयुक्त शिखर



लक्ष्मण - (अनंत)

द्वारशाखा आहे. मत्स्य, वराह, नृसिंह, वामन, त्रिविक्रम, बुद्ध, कल्की ही रूपं स्पष्ट दिसतात. ललाटबिंबावर शेषशायी विष्णू आहे. त्याच्या डावीकडे 'केशीवध' तर उजवीकडे 'हयग्रीव' नाशाचे शिल्प आहे.

आता इतक्या सगळ्या पुराव्यांवरून हे विष्णूचंच मंदिर होतं यात काही शंका नाही. पण मग नाव लक्ष्मणाचं का ते माहित नाही. गाभाऱ्यात शेषावर बसलेला अनंत रूपातला विष्णू आहे. इथे तो दोनच हातांचा आहे आणि आयुधेही नाहीत. म्हणूनच याला लक्ष्मण म्हणत असतील असं मला वाटलं. कारण राम हा विष्णूचा तर लक्ष्मण हा शेषाचा अवतार, शिवाय पलिकडे जवळच भग्न राममंदिरही आहे.

नाव काहीही असो, मूर्ती मात्र सुरेख आहे.

आकाराने लहान होत जाणाऱ्या गवाक्षांमुळे शिखर सुंदर दिसतं. बाह्य भिंतीवरची लाकडी दरवाज्याचा आभास निर्माण करणारी कवाडंही छान दिसतात. डागडुजीचं काम चालू असल्याने बांबू उभारलेले होते. आवारात एक खोल विहीर पहायला मिळाली जी जाळीने बंद केलेली होती.

लक्ष्मण मंदिराजवळ पुरातत्त्व खात्याचं संग्रहालय आहे. आसपास सापडलेली शिल्पं तिथे जतन केलेली आहेत. महिषासुरमर्दिनी, गंगा, यमुना, सूर्य, नृसिंह, अंबिका, आदिनाथ अशी बरीच बघायला मिळाली.

◆◆◆



पायरीचे दगड जोडणारी लोखंडी पट्टी



नृसिंह



संग्रहालयातील महिषासुरमर्दिनी



भग्न रथ



भग्न हत्ती



आवारातील खोल विहीर



चतुर्मुख
शिवलिंग

# १२. तीवरदेव महाविहार



पुढचं ठिकाण होतं तीवरदेव महाविहार! तीवरदेव महाशिवगुप्त हा सहाव्या शतकातला पंडु वंशीय राजा. स्वतः विष्णुभक्त असूनही इतर धर्मांनाही उत्तेजन दिलं. अत्यंत कोरीव प्रवेशद्वार हे वैशिष्ट्य इथंही दिसलं. बौद्ध विहार असूनही वानर-मगर, बगळा-खेकडा, बेडूक-साप अशा पंचतंत्रातल्या कथा इथे कोरलेल्या आहेत. गंमत म्हणजे बगळ्याच्या गोष्टीतला उन्हाळा दाखवण्यासाठी आंब्याचं झाड कोरलं आहे.

प्रणयी युगुलेही सुबक नि सुरेख ! एका शिल्पात जोडीदाराच्या पायावर पाय पडल्याने क्षमा मागणारी स्त्री आहे तर दुसरीकडे शृंगारमग्न अवस्थेत मुद्दाम पायावर पाय ठेवून उभी असलेली स्त्री आहे. प्रणयाचे प्रतीक म्हणून काही ठिकाणी भुंगा किंवा फुलावर बसलेली मधमाशी अशी प्रतीकं आहेत.

नीलगाय, टक्कर देणारे मेंढे, खार, असे प्राणीही आहेत. प्रवेशद्वारात पतीपत्नी मुलगा आणि कुत्र्यासह आहेत, जणू फिरायला निघाले आहेत. हत्तींच्या शृंगाराचे दृश्य आहे. डॉक्टर अरुणकुमार शर्मांच्या मते इथे पूर्वी हत्तींचे प्रजनन केंद्र असावे. इथल्या पोकळ दगडी जाळ्याही छान आहेत.

आत बुद्धमूर्ती आहे. तिचे डोके व धड वेगवेगळे सापडले होते, ते नंतर जोडून ठेवले गेले. बाहेर पसरलेले अवशेष बघून इथे दुमजली विहार होता याची कल्पना येते. असं म्हणतात की या नगरात लहान मोठे मिळून शंभर विहार होते आणि त्यात दहा हजार विद्यार्थ्यांची सोय केलेली होती.

सिरपुरची श्रीमंती पुढल्या भागात पाहूया.

◆◆◆



तीवरदेव महाविहार



ललाटपट्टी



क्षमा याचना करणारी स्त्री



प्रणयी युगुल



अभिषेक लक्ष्मी



प्रणयमग्न हत्ती



गरुड



मेंढ्यांची झुंज



नर्तक-वादक



कुत्र्यासह कुटुंब



नीलगाय



बुद्ध भूमीस्पर्श मुद्रा



मगर–माकड पंचतंत्र कथा



सुंदरी



बगळा–खेकडा

# १३. श्रीपुर



श्रीपुर नावाप्रमाणे समृद्ध होतं असं मी सांगितलं होतं. इथल्या उत्खननातून तसे बरेच पुरावे मिळाले आहेत. याविषयी पुरातत्त्वज्ञ डॉक्टर अरुणकुमार शर्मांची मुलाखत यू ट्यूब वर आहे. जगातली सर्वात जुनी मोठी बाजारपेठ इथे सापडली असा त्यांचा दावा आहे.

श्रीपुरहून कटकला जलमार्गाने तर सुरतेला जमिनीवरून व्यापार चालत असे. तांदूळ आणि आयुर्वेदिक औषधे जात होती. गुजरात व राजस्थानचे व्यापारी इथे येत असल्याने जैन विहार सापडले आहेत. आदिनाथ, पार्श्वनाथ यांच्या आठ फूट उंच मूर्ती मिळाल्या आहेत.

सर्व दुकाने दुमजली असून खाली दुकान आणि वर रहाण्याची व्यवस्था होती. लोहार,सोनार, तांदूळ व्यापारी यांचे वेगळे विभाग असत. एकेका कोठारात सहा क्विंटल धान्य मावेल अशी अठ्ठेचाळीस कोठारे जमिनीखाली मिळाली. सलग दोन अडीच वर्षे दुष्काळ पडला असता तरी चिंता नव्हती. दारूच्या नि रसायनाच्या भट्ट्याही जमिनीखाली मिळाल्या.

आयुर्वेदिक उपचारासाठी स्नानकुंड आणि दहा खाटांचे रुग्णालय सुद्धा इथे होते. कमाल म्हणजे मनगटात छोटी लोखंडी सळई असलेला अवशेष मिळाला आहे. व्यापारा बरोबर हे उपचारांचेही केद्र असावे असे डॉ. शर्मांचे मत आहे. दहा- बारा खोल्यांची प्रशस्त घरंही होती आणि प्रत्येक घरात पावसाचं पाणी साठवण्यासाठी कुंड असे. इथे सापडलेल्या उखळी, पाटे, वरवंटे, रगडे यांच्या संख्येवरून या गावाची लोकसंख्या पन्नास हजार असावी असे अनुमान आहे.

नदीकिनारी वेदपाठशाळेचे अवशेष मिळाले आहेत. तिथे विष्णू मूर्ती होती. चौसष्ट विद्यार्थी रहात असावेत.

कमाल अशी की जमिनीखाली गटारं होती. कचरा गावाबाहेर खड्ड्यात पुरण्याची व्यवस्था होती. स्वच्छतेची परंपरा इतकी मागे जात असेल याची मला कल्पना नव्हती !!! उगाच नाही सलग दोन वर्षे स्वच्छ राज्य पुरस्कार मिळाला !!

◆◆◆



रुंद रस्ते





व्यापारी केंद्राचे अवशेष

जमिनीखाली सांडपाण्याची व्यवस्था



घराचे अवशेष



श्रीपुर येथील रुग्णालय



भली मोठी विहीर





वेदपाठशाळेचे अवशेष

आयुर्वेदिक स्नान कुंड

# १४. सुरंग टीला



सिरपुरची खोली अनुभवल्यावर उंचीसाठी सुरंग टीला गाठलं. पंचायतन पद्धतीची मंदिरं आहेत. अतिशय अरुंद दगडी पायऱ्या चढून वर जावं लागतं. सुमारे चाळीसच पायऱ्या आहेत पण बाराव्या शतकातल्या भूकंपामुळे वेड्यावाकड्या हलल्या आहेत आणि अगदी उभी चढण आहे. मंदिरं हलली नाहीत कारण खाली निर्वात पोकळीची रचना पूर्वीच केलेली होती.

त्यासाठी ऐंशी फूट खोल खड्डे खणून त्यात भरपूर पालापाचोळा टाकून पेटवला आणि सर्व धूर निघून गेल्यावर दगड सरकवून टाकला गेला. या पोकळीने मंदिरांचं रक्षण केलं.अर्थात आता काळाच्या ओघात नुकसान झालेच आहे. मुख्य मंदिरात पाच गाभारे आहेत. एकात गणपती नि बाकीच्यांत लाल, काळा, पिवळा, पांढरा या रंगांच्या दगडाची शिवलिंगं आहेत. दुरुस्ती चालू असल्याने फारसं आत जाता आलं नाही. बाहेर बत्तीस खांबी मांडवाच्या खुणा आहेत. खांबांवर काही छोटी भग्न शिल्पं पाहायला मिळाली.

आवारात एक खुला मंडप असल्यासारखी रचना आहे. शिवाय ब्रह्मा-विष्णू-महेश यांची छोटी मंदिरंही ! तिथे तांत्रिक पूजा चालत असावी,तसा फलकही तिथे आहे. सुरंग टीलाचं वैशिष्ट्य म्हणजे हे संपूर्णपणे दगडांचंच आहे. बाकी मंदिरांचा पाया फक्त दगडी आणि वर वीटकाम होतं. विटा हलक्या आणि मजबूत होण्यासाठी एक युक्ती करत. महानदीतली पिवळी माती, भुस्सा, भाताचं तूस सर्व एकत्र करून विटा बनवत. भाजताना बाकीचं जळून विटा सच्छिद्र बनत.

सूर्यास्ताच्या वेळी गंधेश्वर मंदिर बघितलं. मराठ्यांच्या काळात याचा जीर्णोद्धार झाला आहे. बाहेर नटराज, उमामहेश्वर, महिषासुरमर्दिनी, बुद्ध अशी काही शिल्पं दिसली. सांजवातीच्या उजेडात वेगळीच भासली. शेवटी मागच्या पायऱ्यांवरून महानदीचं दर्शन घेतलं.नितळ निळ्या आकाशाचं तिच्या तितक्याच नितळ पाण्यातलं प्रतिबिंब फार सुखावणारं होतं.

◆◆◆



सुरंग टीला



सुरंग टीला



भग्न गाभारा



भग्न स्तंभ



धारालिंग प्रकारचे शिवलिंग



भग्न स्तंभ



आवारातील भग्न मंडपाचे अवशेष

# १५. गोष्ट राजिम तेलीणीची



आता एक मस्त गोष्ट पाहू या. राजिम तेलीण आणि राजीव लोचन मंदिर !

राजिम हे रायपूर जवळचं एक गाव, ज्याचं मूळ नाव होतं पद्मपुरी. खूप खूप वर्षांपूर्वी तिथे एक रत्नाकर नावाचा राजा होता. त्याच्या यज्ञात राक्षस त्रास देत असल्याने त्याने 'राजीव लोचन'(कमल नयन) रूपातल्या विष्णूचा धावा केला आणि घोर तपस्या केली. विष्णूने स्वतः येऊन यज्ञाची विघ्ने दूर केली. यज्ञ पूर्ण झाल्यावर त्याने राजाला वर मागण्यास सांगितले. याच रूपात तू कायम आमच्या जवळ राहा असा वर त्याने मागितला. विष्णूने विश्वकर्म्याला बोलावून सांगितले मी एक कमळ पृथ्वीवर पाठवतो,त्यावर एक मंदिर निर्माण कर. रातोरात मंदिर तयार झालं. राजा नि प्रजा खूष !!

पण शेजारच्या कांकेरच्या राजाला ते बघवले नाही. इतकी सुंदर मूर्ती आपल्याजवळच हवी, म्हणून त्याने ती पळवली. पण वाटेतच नाव बुडून त्याचा मृत्यू झाला. मग राजिमचे लोक त्या मूर्तिविहीन मंदिरात जाऊनच पूजा करत असत. राजिम तेलीण त्यांपैकीच एक ! घाण्यावर तेल काढून विकून उपजीविका करत होती. रोज नेमाने स्नान करून मंदिरात जायची. एकदा नदीवर स्नान करायला जातांना एका शिळेला अडखळली. ती उचलून तिने घरी आणली आणि उखळावर ठेवली. ती शिळा खरं तर विष्णूची मूर्ती होती. तेंव्हापासून तेलाची विक्री वाढली आणि खूप भरभराट झाली. त्यावेळचा राजा जगत्पाल याला स्वप्नात येऊन देवाने सांगितले की माझ्या मूर्तीची स्थापना कर. मंदिराला साजेशी सुरेख मूर्ती आणायची कुठून? लोकांकडून त्याला तेलिणीकडच्या मूर्तीविषयी समजले. मूर्तीच्या वजनाइतके सोने देऊ केले. राजाज्ञा म्हणून तेलीण कशीबशी तयार झाली. पण कितीही सोने टाकले तरी मूर्तीचे पारडे हलेचना ! देवाने सांगितले की त्यावर तुळशीचे पान ठेव. तसे केल्यावर पारडे हलले. राजा खजील झाला. संपत्तीचा गर्व बाजूला ठेवून तेलिणीला नम्र विनंती केली. तिने विना मोबदला मूर्ती दिली. फक्त एक अट घातली – माझ्या देवाबरोबर माझं नाव जोडलं जाऊदे. राजाने आनंदाने मान्य केलं. शेवटपर्यंत ती त्या मंदिरात जात राहिली आणि शेवटी मूर्ती बघतच प्राण त्यागले.

आज गावाचं नाव तिच्यावरूनच राजिम असं आहे आणि राजीव लोचन

मंदिराच्या आवारात सुरुवातीलाच या तेलिणीचं मंदिर आहे. दर वसंत पंचमीला तिची मोठी पूजा होते. मंदिरात तिचा तेलाचा घाणा, सूर्य–चंद्र आणि मजकूर असं कोरलेला दगड आहे. तो जुना झिजलेला असल्याने त्याची एक प्रतिकृतीही आहे. शिवाय राजिम तेलिणीची मूर्तीही आहे. राजिम जवळ महानदी,पैरी आणि सोंडूर या तीन नद्यांचा संगम होत असल्याने त्याला 'छत्तीसगढचे प्रयाग' म्हणतात आणि इथेही कुंभ मेळा होतो.

◆◆◆



**राजिम तेलीण**



**घाणा कोरलेली शिळा**



**राजिम तेलिणीचे मंदिर**

# १६. राजीव लोचन मंदिर



राजीव लोचन मंदिरात जाण्यासाठी दोन्ही बाजूंना ओटे असलेला एक प्रशस्त दरवाजा आहे. त्यावरही सुरेख कोरीवकाम आहे. ललाट बिंबावर गजलक्ष्मी आहे. तिच्या वरच्या बाजूला शेषशायी विष्णू बघण्यासारखा आहे. डावा हात उशाला घेऊन शेषाच्या वेटोळ्यांवर मस्त पहुडला आहे. दुसऱ्या डाव्या हातात शंख, एका उजव्या हातात चक्र आणि दुसरा नुसता आरामात ठेवला आहे. नाभी कमलात ब्रह्मा आहे.

मुख्य मंदिरात जाण्यासाठी दोन दरवाजे आहेत. त्यावर खेळणारी मुले कोरली आहेत. आत छानसे कोरलेले खांब आहेत ज्यावर वेगवेगळी शिल्पे आहेत. तीन सिंह नि दोन हत्ती असलेला शिल्प शेषाचा प्रकार नेहमीपेक्षा जरा वेगळा दिसला. अर्ध स्तंभांवर गंगा, यमुना, नरसिंह आणि वराह सुबक दिसतात. गर्भगृहाच्या ललाटावर मात्र गरुडारूढ विष्णू आहे पाच पदरी द्वारशाखेत एका पदरात फक्त शेष कोरला आहे – सुंदर सर्प शाखा आहे. आत काळ्या पाषाणाचा राजीव लोचन चारही आयुधांसह उभा आहे.

मंडपातल्या भितींवर संस्कृत भाषेतले दोन कोरीव लेख आहेत. खराब होऊ नयेत म्हणून वरून काच लावली आहे. इसवी सनाच्या सातव्या शतकात नळ वंशीय राजा विलासतुंगने आपल्या मुलाच्या स्मरणार्थ हे मंदिर उभारले हे पहिल्या लेखात सांगितले आहे. मंदिराचं वर्णन केल्यावर विष्णूची स्तुती आहे. मग नलराजाची स्तुती करून त्याच वंशातला मी आहे असं हा राजा म्हणतो. या आधी होऊन गेलेल्या पृथ्वीराज, विरूपराज यांची नावेही आहेत. हा कुटील नागरी लिपीत असल्याने नीट वाचता आला नाही. दुसरा लेख जगपाल (जगतपाल) राजाचा आहे. तो कलचुरींचा सामंत होता आणि त्यांचं राज्य वाढवण्यात त्याचा फार मोठा वाटा होता. त्याने राम मंदिर निर्माण केले आणि देवाच्या प्रसादासाठी शाल्मलीय ग्राम दान दिले असा लेखात उल्लेख आहे. हा देव नागरी लिपीत असल्याने वाचता येत होता. या मंदिराच्या आवारात नरसिंह, कृष्ण अशा इतर अवतारांची छोटी मंदिरे आहेत..

◆◆◆



जगत्पाल राजा



कोरीव खांब



कोरीव दरवाजा



सर्पशाखेसह ललाटावर गरुड



गंगा



यमुना



वराह



नृसिंह



शिल्प श्लेष



राजीव लोचन



ललाट पट्टीवरील शेषशायी विष्णू

# १७. पाषाण चित्रे

राजिमची कथा सांगतांना मी कांकेरच्या राजाचा उल्लेख केला होता. या कांकेर जिल्ह्यात एक खूप पुरातन खजिना दडला आहे. चरामा किंवा चरमा गुहा आणि शैलाश्रय यांत मानवाने काही हजार वर्षांपूर्वी काढलेली चित्रे आहेत.

काही प्रचंड आकाराच्या पाषाणांवर नुसतेच हाताचे पंजे उमटवलेले आहेत. या पंज्यांविषयी असं म्हणतात की मुलीला पहिली पाळी आली की वयात आल्याचा सोहळा म्हणून असे लाल रंगाचे हातांचे ठसे उमटवत असत.

जवळच आणखी एका पाषाणावर मानवाकृती रंगवलेल्या आहेत. स्थानिक लोक या आकृतींची पूजाही करतात. यातल्या गडद आकृती म्हणजे परग्रहावरील जीव आहेत आणि छत्तीसगढ सरकार या संदर्भात नासाची मदत घेणार आहे अशी एक भन्नाट अफवा मध्यंतरी पसरली होती. अगदी एक पुरातत्त्वज्ञ देखील याविषयी बोलत होते. स्थानिक लोक यांना रोहिला (छोटी माणसे) म्हणतात आणि हे आकाशातून येऊन इथल्या लोकांना घेऊन जातात अशी समजूत आहे.

खास या गुहाचित्रांवर काम करणाऱ्या संशोधक मीनाक्षी दुबे यांनी विशिष्ट पद्धतीने या चित्रांच्या फोटोंचे विश्लेषण करून हा परग्रहवासी विषयक दावा खोटा ठरवला. मलाही ती साधी माणसांचीच चित्र वाटली. आमच्या बरोबर आलेला एक स्थानिक विदयार्थी हे कसे पाच पांडव आहेत ते पटवण्याचा प्रयत्न करत होता. तो मी अर्थातच हाणून पाडला आणि तिथे पाच पेक्षा जास्त आकृती असल्याचे दाखवून दिले. ही चित्रे पूर्णपणे नैसर्गिक रंगात आहेत आणि म्हणूनच उन्हापावसात उघड्यावर असूनही हजारो वर्षे टिकली आहेत.

ही पाषाण चित्रे पाहण्याच्या मार्गावर एक व्यास गुंफा आहे. इथे बसून व्यास महर्षींनी महाभारताची रचना केली अशी स्थानिकांची श्रद्धा आहे. त्यामुळे व्यासांचा छोटा पुतळा आणि वातावरण निर्मितीसाठी वाघ, यज्ञ कुंड अशी आधुनिक रचना आहे.

◆◆◆



व्यासगुंफा




शैलाश्रयांकडे जाताना



शैलाश्रय



सर्प फण्यासारखा पाषाण



हातांचे लाल ठसे



पुरातन पाषाणचित्रे

# १८. केशकाल व्हॅली



कांकेर मधून पुढे बस्तर भागात केशकाल व्हॅलीकडे जायचं होतं. सकाळी लवकर पोचल्यामुळे मस्त धुक्यात वेढलेले दरी –डोंगर पहायला मिळाले. तिथे एका भागाला टाटा मारी पठार म्हणतात. गंमत अशी की त्या भागात औद्योगिक सुधारणांसाठी टाटा प्रयत्न करणार होते. त्यांनी जागा मोकळी हवी म्हणून झाडं तोडायला सुरुवात केली. स्थानिक लोकांनी जोरदार हरकत घेतली आणि तो प्रयत्न हाणून पाडला. त्यामुळे 'टाटा मारी' नाव! तिकडे उंचावर पर्यटन विभागातर्फे निवास बांधण्याचे काम अंतिम टप्प्यात आलेले दिसले. भिंतींवर छान आदिवासी जीवनाची दृश्ये रंगवली आहेत. मातीत एक लाईम बटरफ्लायची जोडी कितीतरी वेळ क्षार खात बसलेली दिसली. काही सरकारी अधिकाऱ्यांचा कार्यक्रम होता म्हणून इडहार बनवण्याचे काम सुरू होते. तांदूळ आणि उडीद डाळ भिजवून वाटून अळूसारख्या पानात गुंडाळून उकडतात आणि मग कापून खातात– चव इडलीसारखीच असते. तिथेच पानांच्या द्रोणातून भजी मिळाली.

तिथून जवळ गढ धानोरा गावात पाचव्या–सहाव्या शतकातली विटांची भग्न मंदिरं असल्याचं समजलं. पोचल्यावर कळलं की वाटेतल्या ओढ्याचं पाणी वाढलंय त्यामुळे चालत जात येणार नाही. पण आम्ही थोडीच माघार घेणार! पाण्यात दगड आणि काठी टाकून अंदाज घेतला. एकमेकींच्या साथीने ओलांडणं सहज शक्य होतं. मग काय? गेलोच. पूर्णपणे उद्ध्वस्त मंदिरांचे तीन समूह होते आणि त्यातच एक मस्त वर्तुळाकार जलाशय! विटांच्या उंचवट्यावर शिवलिंगं दिसली. एका डागडुजी केलेल्या उंचवट्यावर मात्र शिवलिंगाच्या बाजूने चक्क सिमेंट लावण्याचं काम सुरू होतं. ते बघून अस्वस्थ झाले. असं करू नका म्हणून सांगण्याचा प्रयत्न केला पण तो त्यांच्यापर्यंत पोचलाच नाही!!


छोटंसं तळं

◆◆◆



धुक्यात केशकाल व्हॅली



उद्ध्वस्त मंदिर, गढ धनोरा



पर्यटक निवास १



पर्यटक निवास २




शिवमंदिर, गढ धानोरा



इडहार

लाइम बटरफ्लाय





द्रोण

# १९.झिटकू- मिटकी



केशकाल व्हॅली नंतर भेट दिली कोंडागावला! झिटकू- मिटकी कलाकेंद्रात इथली कांस्य कला पहायची होती. मागे कोलकत्याजवळ विष्णुपूरला डोकरा कला म्हणून पाहिली होती, तीच!

आधी हवी तशी एक मेणाची मूर्ती बनवून घेतात. हे काळसर रंगाचं मेण असतं. माती लिंपून भाजल्यावर मेण वितळून जातं आणि साचा तयार होतो. एकदा साचा तयार झाला की त्यात धातू वितळवून त्याचा रस ओततात. मग भट्टीत छान भाजल्यावर बाहेरचं मातीचं कवच फोडलं की हवी ती मूर्ती तयार! मग अर्थात थोडं सफाई काम, बारकावे उठावदार करणं असं करावं लागतं.

झिटकू आणि मिटकीची गोष्ट इथे खूप प्रसिद्ध आहे. मिटकी ही सात भावांची लाडकी बहीण! ती झिटकूच्या प्रेमात पडली. तो दुसऱ्या गावातला, दुसऱ्या जातीचा त्यामुळे भावांनी विरोध केला. पण झिटकू आपलं गाव सोडून मिटकीच्या गावी यायला तयार झाला. मग काय? छान लग्न होऊन संसार सुरू झाला. पुढे गावात दुष्काळ पडला. मोठ्या तलावाचं पाणी आटलं. बळी दिल्याखेरीज प्रश्न सुटणार नाही ही गावकऱ्यांची ठाम समजूत. झिटकू या गावातला नाही, म्हणून सरळ त्याचाच बळी दिला गेला. इकडे मिटकी शांत झोपली होती. पण तिला स्वप्नात ही घटना दिसली आणि तलाव काठोकाठ तुडुंब भरला असल्याचं दिसलं. ती दचकून उठली, धावत गेली, बघते तर खरंच तलावात भरपूर पाणी! काय घडलं तेही कळलं तिला.. तिने सरळ स्वतःला झोकून दिलं पाण्यात.. पुन्हा कधीही दुष्काळ पडला नाही आणि पाणी कमी पडलं नाही.. बस्तरचे रहिवासी या दोघांची जोडीने पूजा करतात. त्यांना 'गप्पादेई-लक्कादेईफ किंवा 'डोकरा-डोकरी' असंही म्हणतात.



झिटकू-मिटकी

◆◆◆



काळे मेण



धातूचा तयार प्राणी



तीन उंदरांच्या
गाडीत गणपती



धातूचा पक्षी

# २०. कलाग्राम कोंडागाव

कोंडागाव मध्ये अजून दोन कलाविष्कार पाहिले.

Wrought Iron (लोह) पासून खूप मस्त वस्तू बनवतात इथले लोक! या प्रकारात कार्बनचं प्रमाण अतिशय कमी असतं. त्यामुळे नेहमीच्या लोखंडापेक्षा लोह मृदु आणि तापवल्यावर सहज वाकवता येतं. वादक, नर्तक, होड्या, की चेन, पक्षी, प्राणी, असंख्य प्रकार पहायला मिळाले. नुसत्या पातळ तारा वाकवून केलेला मुलीचा चेहरा इतका मोहक होता! सूर्य,गणपती अशा देवताही दुकानांमधून दिसल्या. एकाने आमच्यासमोर अक्षरशः दोन मिनिटांत धावणारा माणूस करून दाखवला. तापवणं- वाकवणं- ठोकणं-पन्हा तापवणं-सरळ करणं हे सगळं तो इतकं पटापट करत होता की कमाल वाटली. गोंड आणि माडिया जमातींनी ही पिढीजात कला जपली आहे. शेती किंवा शिकारीसाठी हत्यारं करता करता तेच कौशल्य कलाविष्कारासाठी वापरलं जाऊ लागलं.

मातीच्या वस्तूही फार मोठ्या प्रमाणात तयार होतात. (Terracotta art) मातीची भांडी, कप, सुरया, तवे, दिवे, धबधबे, प्राणी, पक्षी, पुतळे, भरपूर विविधता!! नंतर चित्रकोटला कुल्फी खाल्ली ती अशा मातीच्या भांड्यांमधूनच ! यासाठी लाल माती वापरतात. तिला भात माती म्हणत असले तरी ती जाड व कमी कसदार असल्याने भातासाठी निरुपयोगी असते. पिवळी वालुकामय मातसी माती भातासाठी छान असते. दुसरी काळी कण्हर माती ओलावा छान धरून ठेवते. त्यामुळे गहू व रब्बी पिकांना उपयुक्त ठरते. आणखी एक डोरसा मातीही आहे- कण्हर व मातसीच्या मधला प्रकार. तर यातल्या लाल मातीपासूनच वस्तू बनवतात.

◆◆◆



टेराकोटा शिल्प





लोहशिल्पे (रॉट आयर्न)



लोहशिल्पे







टेराकोटा शिल्पे



टेराकोटा कारंजे

# २१. मांदरकोट गुहा



आता जगदलपूरला चार दिवस मुक्काम करून आजूबाजूचा प्रदेश बघायचा होता, बस्तरची नीट ओळख करून घ्यायची होती. पहिल्याच दिवशी अनुभवला गुहेतील थरार!

जगदलपूरपासून साधारण चाळीस किलोमीटर अंतरावर मांदरकोट गाव आहे. तिथे जमिनीच्या पोटात एक गुहा आहे. गावाच्या नावावरून गुहाही मांदरकोट गुहा म्हणूनच ओळखली जाते. इथे आमच्या मदतीला अनएक्सप्लोअर्ड बस्तरचे छोटे स्वयंसेवक होते. महाविद्यालयाच्या पहिल्या दुसऱ्या वर्षाची मुलं होती. भाताच्या हिरव्यागार शेतामधून, वाटेतल्या ओढ्यांमधून वाट काढत आम्हाला अलगद नेण्यासाठी खास आली होती. बाजूला हिरवे हिरवे डोंगर होते. वातावरण एकदम मस्त होतं. गुहेपाशी आरामात पोचलो.

ही गुहा तीनशे मीटर लांबीची आहे. पहिल्या थोडयाशा पायऱ्या उतरल्यावर आत बसत-घसरत-रांगत जायचं होतं. त्यामुळे आत काहीच सामान नेता येणार नव्हतं. फोटोसाठी नि प्रकाशासाठी फक्त मोबाईल जवळ ठेवला. खाली अस्वस्थ वाटलं तर चघळण्यासाठी गोळ्याही ठेवल्या आणि मनाचा हिय्या करून उतरायला सुरुवात केली. एकंदर परिस्थिती बघून ५-६ जणींनी माघार घेतली. पण मी हा अनुभव घ्यायचं पक्कं ठरवलं होतं.

आत मिट्ट काळोख होता. निसरडं होतं. सावकाश पावलं टाकत, एकमेकींना आधार देत पुढे जात होतो. मुलं छान सांभाळून नेत होती. नेमकं कुठे धरायचं, पाऊल कुठे ठेवायचं ते बरोब्बर सांगत होती. वाटेवर 'एक अकेला' बेडूक दिसला. खडकाच्या पोटात त्याला बघून मला रामदास स्वामी नि शिवाजी महाराज आठवले. आत बाकी एकही प्राणी किंवा किडा



**भाताच्या शेतातून गुहेकडील रस्ता**



गुहेकडे जाताना





गुहेच्या प्रवेशाजवळ


दिसला नाही. जवळजवळ ५० फूट खोल उतरलो.

आता हा सगळा खटाटोप कशासाठी? तर गुहेत तयार झालेले लवणस्तंभ stalactite आणि stalagmite बघायचे होते. काही stalactite वाढून इतके मोठे झाले होते की त्यांच्याच वजनाने तुटून छताला भोकं शिल्लक राहिलेली होती. एक stalagmite मोठ्या शिवलिंगासारखा दिसत होता आणि मोबाईलच्या प्रकाशात छान चमचमत होता. सगळ्यात खाली एक मोकळी जागा होती, जिथे आदिवासींचे देव ठेवलेले होते. पुढे मातीचे दिवे होते. ते लोक इथे येऊन पूजा वगैरे करतात. एवढा व्याप करून सारखं यायचं म्हणजे कमाल वाटली मला!


देवाचं दर्शन घेऊन पुन्हा सावकाशीने वर चढून आले.... अगदी अखंड... कुठलीही मोडतोड न होता !

◆◆◆






**मांदरकोट गुहेतील लवणस्तंभ**



गुहेतील लवणस्तंभ



गुहेतील देव

# २२. बस्तर



बस्तर म्हणजे नेमका कोणता प्रदेश असा प्रश्न पडला असेल ना ? हा छत्तीसगढचा दक्षिण भाग जंगलं नि टेकड्यांनी वेढल्याने बराच काळ बाजूला पडला होता. पाण्याच्या मुबलकतेमुळे हिरवागार नि आदिवासींमुळे रंगाबेरंगी ! लोकवस्ती तशी विरळ आहे, मुख्यतः सपाटीवरच राहतात. माडिया, गोंड, मुरिया, बैगा असे विविध आदिवासी आहेत. गोंडी, छत्तीसगढी भाषा बोलतात, पण हिंदी समजते. हळूहळू मुख्य प्रवाहात येत आहेत. रानात साल, तेंदू, खैर,पळस, शाल्मली,चंदन, अंजन आणि महत्त्वाचे महुआ-मोहाचे वृक्ष आहेत. भूमी खनिजसमृद्ध आहे-बॉक्साईट, लोह, मँगेनीज, क्वार्टझ्, चुनखडक मुबलक आहेत.

या आदिवासींच्या भाबड्या संकल्पना ते छान जपतात. गाईगुरं प्रेमानं सांभाळतात, त्यांना नैसर्गिक गायरानातच चरायला नेतात. त्यामुळे कृत्रिम आहाराने धष्टपुष्ट नसून लहानखुऱ्याच आहेत. गाईचं दूध तिच्या वासरासाठीच, म्हणून घरच्या मुलाबाळांनाही देत नाहीत. शेण नि मूत्र मात्र खत नि गोवऱ्यांसाठी वापरतात. पीक देणारी जमीन म्हणजे आपली आई मानून तिच्या छातीत नांगराचा लोखंडी फाळ घुसवत नाहीत. बैलांच्या व लाकडाच्या साहाय्याने होईल इतपतच नांगरट करतात.

दंतेश्वरी ही अख्ख्या बस्तरची कुलदेवता असं म्हटलं तरी चालेल. दक्षकन्या सतीची कथा सगळ्यांना माहित आहे. तिचा दात इथे पडला म्हणून ही दंतेश्वरी. गंमत अशी की जगदलपूर नि दंतेवाडा दोन्हीसाठी हीच कथा सांगतात. दोघी बहिणी समजतात. दसऱ्याला मोठा उत्सव असतो,पंचाहत्तर दिवस चालतो.तेव्हा दंतेवाड्याची देवी जगदलपूरला बहिणीला भेटायला येते. बस्तरच्या छोट्या गावांतून मातागुडी म्हणून बत्तीस देवळं आहेत. या बत्तीस बहनाही उत्सवाला येतात. दात बत्तीस म्हणून या बत्तीस दंतेश्वरी की काय असं माझ्या मनात येऊन गेलं.



दंतेश्वरी





महालक्ष्मी–महासरस्वती

महांकाली


बस्तरची चित्रकला



दंतेश्वरीला बस्तरशी जोडणारी एक कथा आहे. राजा अन्नमदेव तिचा निस्सीम भक्त होता. देवीने प्रसन्न होऊन वर दिला. म्हणाली, तू सरळ समोर जेवढा चालशील तेवढी सगळी जमीन तुझी. मी मागोमाग येईन, पण तू एकदाही वळून बघायचं नाही. तसं झाल्यास मी निघून जाईन. राजाने बारासूर पासून चालायला सुरुवात केली. देवीच्या पैंजणांचा आवाज मागून येत होता. अचानक राजिमजवळ पोचल्यावर आवाज येईनासा झाला. न राहवून राजाने वळून पाहिले, तर देवी होतीच. नदीकाठच्या वाळूमुळे तिच्या पैंजणांचा आवाज येत नव्हता. पण अटीचा भंग झाल्यामुळे ती निघाली. तिने राजाला एक तलम वस्त्र दिले. या वस्त्राखाली मावेल ते तुझं राज्य. तू आणि तुझे वंशज सुखात रहा. असं सांगून ती अंतर्धान पावली. या कापडामुळेच बस्तर नाव मिळालं या प्रदेशाला.

◆◆◆

**बस्तर येथील भिंतीवरील ग्रामीण चित्रकला**







# २३.अबब धबधबे



आता इथल्या पाण्याची मजाही घ्यायची होती. ही सहल सप्टेंबरच्या शेवटी असल्यामुळे सगळ्या नद्यांना भरपूर पाणी होतं. गोदावरी आणि महानदी या मुख्य नद्या आणि शिवनाथ, खारून, हसदो, जोंक, पेअरी, तेल, नागावती, इंद्रावती, वंशधारा, शबरी अश्या अनेक उपनद्या ! बाजूने मेकल सारख्या डोंगर रांगा आणि त्यातून उड्या घेणाऱ्या नद्यांमुळे इथे खूप धबधबे तयार झाले आहेत. जून ते ऑक्टोबर पावसाळा असतो. पण पाऊस बेभरवशी असल्याने दुष्काळाचाही सामना करावा लागतो. जेंव्हा पडतो तेंव्हा पुराचा धोका असतो, त्यामुळे नद्यांकाठी वस्ती पाहायला मिळत नाही.

इथला सगळ्यात खास धबधबा आहे जगदलपूरजवळ चित्रकोटला ! इंद्रावती नदीवरचा हा धबधबा 'मिनी नायगारा' म्हणून ओळखला जातो आणि खरोखर तसाच दिसतो. आमचा मुक्काम जवळच्याच दण्डामी /दाण्डामी पर्यटक निवासात होता. बस्तरच्या एका जमातीच्या नावावरून हे नाव आहे. पण पहिल्या दिवशी तिथे जागा न मिळाल्याने मी शासकीय निवासात होते. माझी खोली, दरवाजा, त्याच्या कड्या सगळं मस्त हादरत होतं. आधी कारण कळेना, मग लक्षात आलं कि शेजारच्या प्रपाताच्या प्रचंड शक्तीने पडणाऱ्या पाण्याचा प्रताप होता! (वा! प चा अनुप्रास जमला !!) एक वेगळाच अनुभव होता!


काठावर एक शिवमंदिर आहे. त्याचं वैशिष्ट्य म्हणजे मंदिराचा कळस एक शिवलिंगच आहे ! असं पहिल्यांदाच बघितलं.

तिरथगड नावाचा धबधबा बघायचा होता. बहुधा तीर्थगड असं नाव असणार पण अगदी पाटीवरही 'तिरथगड' असंच लिहिलेलं होतं. प्रथम माथ्यावर पोचलो तर तिथून अगदी छोट्या छोट्या धारा पडतांना दिसत होत्या. तळातली माणसं अगदी बारीक दिसत होती. वळसा घालून पायऱ्या उतरायला लागल्यावर हळूहळू त्याचं विशाल रूप दिसू लागलं. पांढरं शुभ्र थंड पाणी डोळ्यांना आणि गात्रांना सुखावणारं होतं. तांबडी घुमार आणि मेंद्री घुमार असे अजून दोन धबधबेही पाहिले. प्रत्येकाचं रूप वेगळंच! गर्द हिरवी वनराई, तांबडे डोंगरकडे आणि झेपावणारे शुभ्र धबधबे बघतांना जागोजाग निसर्गाने तिरंगे उभारल्यासारखं वाटत होतं. किती फोटो, किती चित्रफीती घ्याव्यात ते कळत नव्हतं. डोळ्यांनी जे अनुभवता येतं ना ते कॅमेऱ्यात टिपताच येत नाही.दिवस सरतांना मस्त पाऊस आला आणि इंद्रधनुष्य ही दिसलं !

◆◆◆




चित्रकोट धबधबा



तांबडी घुमार

इंद्रधनुष्याचे दर्शन





मेंद्री घुमार धबधबा





तिरथगढ धबधबा



तिरथगढ धबधब्याची व्याप्ती



चित्रकोट धबधबा (मिनी नायगारा)



काठावरील शिवमंदिर

दंडामी पर्यटक निवास



# २४. माडिया नृत्य



बस्तरच्या धबधब्यांनंतर तिथला पाऊस सुद्धा अनुभवला. माडियांच्या वस्तीत जाऊन त्यांचं नृत्य पहायचं होतं. तिथे पोचलो तेंव्हा वातावरण ढगाळ होतं. कलाकारांची तयार होण्याची धांदल सुरू होती. अचानक ढगांचा गडगडाट झाला आणि पाठोपाठ पावसाचे टपोरे थेंब पडू लागले. हां हां म्हणता पावसाचा जोर वाढला.

आम्ही अर्ध्या ओल्या अवस्थेत कशाबश्या बसलो होतो. पाऊस थांबायचे लक्षण दिसेना.. शेवटी बिचारे माडिया तिथल्याच एका छोट्याशा जागेत नाच करतो म्हणाले. पण छपरावर पाणी आणि कडेने पागोळ्या ओघळत आहेत या परिस्थितीत कसं हो म्हणणार ?

शेवटी त्यांना बसमध्ये घेऊन परत जायचं आणि पर्यटक निवासाच्या आवारात नाच करायला सांगायचं असं ठरलं. लाजत संकोचत कसे तरी ते बसले. थोडं पुढे गेल्यावर जसा आला तसा पाऊस थांबला ! त्यांची इतकी धांदल झाली ! आम्हाला इथेच उतरवा, आम्ही शेतात नाच करून दाखवतो असं म्हणू लागले. मग बस रस्त्याच्या कडेला थांबवून सगळेच उतरलो. भोवती हिरवंगार भाताचं शेत, वर ओथंबून आलेलं आकाश अशा झक्कास वातावरणात तासभर त्यांचं नृत्य बघायला मिळालं ! पर्यटक निवासाच्या निर्जीव भिंतींच्या आडोशात हे असं अनुभवता आलंच नसतं. खुल्या आभाळाखालीच त्याची मजा..पुरुषांची डोक्यावर ठेवलेली शिंगांची टोपी इतकी आकर्षक होती की ती घालून नाचण्याचा मोह मला आवरलाच नाही. (त्यांना बायसन हॉर्न माडिया असंच म्हणतात.) जोडीला बायकांच्या हातातली घुंगुर काठी घेतली. नाचण्याची हौस भागवून घेतली. ...

◆◆◆



**डोक्यावर शिंगांची टोपी आणि हातात घुंगराची काठी**



पाऊस थांबण्याची वाट बघताना





माडिया नृत्य



माडिया स्त्री



माडिया पुरुष नृत्य

# २५. बाणासुराचं गाव 

बस्तर मधला एक प्रमुख जिल्हा 'दंतेवाडा'..हिंसक घटनांच्या संदर्भात नाव ऐकलं होतं. पण प्रत्यक्ष भेटीत त्याची पुसटशी सुद्धा जाणीव झाली नाही. बारासूर हे इथलं एक छोटंसं गाव बघायचं होतं. बाणासुराची कथा सांगणारं एक गणेश मंदिर इथे आहे. बाणासुराची कन्या उषा आणि तिची सखी चित्रलेखा या दोघी गणेश भक्त. म्हणून बाणासुराने एकाच मंदिरात दोघींसाठी दोन गणेश मूर्ती स्थापन केल्या. मोठी उषेसाठी नि छोटी चित्रलेखेसाठी! या एकसंध दगडी मूर्तींची आजही पूजा केली जाते. मोठा गणपती मोदकांचं भांड धरून बसला आहे तर छोट्या गणपतीच्या सोंडेत मोदक आहे. त्याला बहुधा भूक लागली असावी !!

बत्तिसा मंदिर हे बत्तीस दगडी खांबांचं शिवमंदिर त्यातल्या दोन गाभाऱ्यांमुळे वैशिष्ट्यपूर्ण आहे. छिंदक नाग वंशाच्या राजांनी १०-११व्या शतकात हे बांधलं. राजा राणी इथे नियमित पूजा करत असत असं सांगितलं जातं. काहींची अशीही समजूत आहे की शिवलिंगाच्या खाली खजिना दडवलेला होता! कारण इथलं शिवलिंग चक्क हलतं, गोल फिरवता येतं. इथला नंदी फार सुरेख कोरलेला आहे.

मामा-भांजा मंदिराची कथा मजेशीर आहे. राजाने एका दिवसात मंदिर पूर्ण करण्याची अट घातली होती. ती मामाभाच्याच्या जोडीने पूर्ण केली म्हणून त्यांच्या नावाने मंदिर ओळखलं जातं. असंही म्हणतात की मामा एका दिवसात मंदिर बांधू शकला नाही म्हणून राजाने मृत्युदंड दिला. मग भाच्याने काम पूर्ण केलं. म्हणून हे नाव! शिखराच्या जवळ दोघांची शिल्पं कोरलेली आहेत असं म्हणतात. मला तरी ते मंदिर चारीण किंवा भारवाहक असतात तसे वाटले. असे बऱ्याच मंदिरांवर कोरलेले असतात. गाभाऱ्यात गणपती नि नृसिंह या दोन मूर्ती आहेत. बाह्यभिंतीतली देवकोष्ठे रिकामी आहेत.

मामा-भांजा मंदिर



चंद्रादित्य मंदिर पुढच्या वेळी !!

◆◆◆





जोड गणपती, बारासूर



बत्तिसा मंदिर
बारासूर



नंदी, बत्तिसा मंदिर



खांब, बत्तिसा मंदिर

# २६. चंद्रादित्य मंदिर



बारासूरला एक कोरीव लेख मिळाला आहे. त्यानुसार इथल्या छिंदक नाग वंशात जगदेव भूषण नावाचा राजा होऊन गेला. त्याचा सामंत चंद्रादित्य याने ११व्या शतकात (इ.स. १०६१) इथे एक शिव मंदिर बांधलं. चंद्रादित्य नावाच्याच तळ्याकाठी हे मंदिर आहे आणि त्याच नावाने ओळखलं जातं. पंचरथ प्रकारचं गर्भगृह आहे. बाह्य भागावर विष्णूचे अवतार, शिव, पार्वती, गणपती, दक्ष, सुरसुंदरी, प्रणयी युगुले, लढणारे योद्धे अशी अनेक शिल्पे आहेत.

त्यातली दोन शिल्पं मला फारच आवडली. एकात पत्नी पतीची तर दुसऱ्यात पती पत्नीची केशरचना करण्यात मग्न आहे, असं शिल्पांकित केलेलं आहे.स्त्री पुरुष समानतेचं आणखी कोणतं लक्षण हवं? इथे खरोखर तशी समानता आहेही. इथे स्त्री-पुरुष प्रमाण सर्वात अधिक समतोल आहे. दर एक हजार मुलांमागे नऊशे एक्क्याण्णव मुली इतकं आहे. मुली रिक्षा, टॅक्सी अगदी हॉटेलही छान चालवतात.

पार्वती गणेश ध्वज घेऊन उभी असलेली पहिल्यांदाच इथे पाहिली. हातात कलश आणि शेजारी ससा असं चंद्राचं शिल्पही दिसलं.इथे तांत्रिक पूजा चालत असावी असं समजतात.



चंद्रदेव



स्त्री पुरुषाची केशरचना करताना



पुरुष स्त्रीची केशरचना करताना


तहानलेल्यास पाणी पाजताना


पोटात खंजीर खुपसताना


चंद्रादित्य मंदिरावरील शिल्पे


गणेशध्वजासह पार्वती

दक्ष किंवा वसु



# २७. गमवाडा



बस्तर आदिवासींचा एक रिवाज म्हणजे मृत्यूनंतर स्मारक शिळा उभारणे. जितका त्या व्यक्तीचा मान मोठा, तितका दगडाचा आकारही मोठा! शिवाय मग वेगळ्या ओट्यावर उभारणे किंवा शिळा गुळगुळीत करून रंगवणे असेही प्रकार मान आणि ऐपतीनुसार केले जातात. एका कुटुंबातील सदस्यांच्या शिळा जवळ जवळ रोवल्या जातात. कधी जमिनीत त्यांच्या अस्थी, वस्तू पुरून मग वर दगड रोवला जातो.

गमवाडा येथे अशा अनेक स्मारक शिळा बघायला मिळाल्या. शिवाय ग्राम देवतांची देवळेही पहिली. पण आत जाण्यासाठी त्या विशिष्ट स्थानिक लोकांची परवानगी लागते. देवगुडीच्या देवाच्या पालख्यांचे दुरूनच फोटो काढता आले. एक मजेशीर किस्सा ऐकायला मिळाला. पाऊस पडावा म्हणून जसं देवीला साकडं घालतात, तसं पाऊस पडला नाही तर चक्क देवीवर खटला भरून शिक्षाही सुनावतात. गावातले प्रतिष्ठित, पुजारी यांच्या देखत चालतो खटला! आणि कबूल केल्याप्रमाणे पीक पाणी न झाल्याने देवीला एक आठवडा किंवा अधिक काळ पूजा-नैवेद्याशिवाय राहण्याची शिक्षा मिळते. कुणी तिची प्रार्थना करायची नाही. मुदत संपल्यावर पुन्हा सर्व व्यवहार सुरु.. इथे रस्ते किंवा डांबरीकरण नीट झालं नाही, पूल पडले, इमारती कोसळल्या तरी आपण काहीही करत नाही ! निमूट अन्याय सहन करतो... कोण अधिक शहाणे म्हणायचे ? शहरातले की गावातले ? ? ?

◆◆◆



देवगुडी
पालख्या



स्मृतीशिळा





# २८. रायपूर



आता गटाबरोबर फिरण्याचा शेवटचा दिवस होता.

रायपूरचं महंत घासीदास स्मारकसंग्रहालय बघायचं ठरवलं होतं. आसपास मिळालेल्या मूर्ती, ताम्रपट, शिलालेख, इतर अवशेष इथे ठेवलेले आहेत. आवारात जबलपूरहून मिळालेल्या जैन तीर्थंकरांच्या मूर्तीही आहेत. आत शेषशायी विष्णू, उमा–महेश्वर, पार्श्वनाथ, चवरीधारिणी यांची देखणी शिल्पं बघायला मिळाली. मडवा महालचा लेखही दिसला. किरारीला सापडलेला एक लाकडावरचा कोरीव लेख छान काचेत बंदिस्त करून ठेवलेला आहे. सातवाहन काळातल्या शासकीय अधिकाऱ्यांची नावं त्यावर कोरलेली आहेत, अगदी त्यांच्या पदांसह. लाकडी स्तंभावरचा हा भारतातला एकमेव लेख आहे– अतिशय दुर्मिळ. वाईट बोलू नका/ऐकू नका /पाहू नका हे सांगणारी माकडं नव्हेत तर चक्क वाघ बघायला मिळाले.

संग्रहालय पाहून बरोबरच्या सगळ्या विमानतळाकडे रवाना  झाल्या परतीच्या प्रवासासाठी आणि मी निघाले बिलासपूरकडे पुढच्या प्रवासासाठी !!

माझ्या एकटीच्या भटकंतीत काय काय मज्जा आली ते आता पुढच्या वेळी !!

◆◆◆



रायपूर येथील संग्रहालय


कार्तिकेय



शेषशायी विष्णू


चवरीधारिणी


उमा महेश्वर


नर्तक

ब्रह्मदेव



आवारातील पार्श्वनाथ


ना बोल बुरा


रतनपूरचा राजा

# २९. महामाया मंदिर



आता खरी मजा सुरू झाली होती – एकटीच्या भटकंतीची ! खूप फायदे असतात. मला हवं तिथे हवा तितका वेळ थांबता येतं, सामान्य लोकांत मिसळता येतं, त्यांच्याकडून वेगळी माहिती समजते, रस्त्याच्या कडेला मिळणारे स्थानिक पदार्थ खाता येतात, आयत्या वेळी बेत बदलता येतात .....

माझा पहिला मुक्काम होता बिलासपूरला. सकाळी लवकर उठून रतनपूरचं महामाया मंदिर बघायला गेले. अकराव्या शतकात कलचुरी राजवटीत बांधलेलं मंदिर आहे. नंतर मराठ्यांच्या राजवटीत जीर्णोद्धार झाला. महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या तिघींचं एकत्रित रूप म्हणजे महामाया! असं म्हणतात की सतीचा उजवा खांदा इथे पडला होता म्हणून हे शक्तीपीठ निर्माण झालं.

मंदिराविषयी एक कथा सांगितली जाते. हैहय वंशातला कलचुरी राजा रत्नदेव इ.स. १०४२ मध्ये इथे शिकारीसाठी आला होता. रात्री वडाच्या झाडापाशी विश्रांती घेतली. मध्यरात्री ही जागा दिव्य प्रकाशात उजळून निघालेली दिसली. हा दैवी संकेत मानून राजाने महामायेचे मंदिर निर्माण केले आणि रतनपूर आपली राजधानी बनवली. ११व्या शतकापासून १८व्या शतकापर्यंत हीच राजधानी कायम होती.

हे जागृत देवस्थान असून मंदिरात पूजाअर्चा चालते. त्यामुळे इथे फोटो काढण्यास परवानगी नाही. पण बाहेरून थोडे घेता आले. आवारात कडेला सूर्य, कार्तिकेय, नृत्य गणेश अशा मूर्ती पहायला मिळाल्या. गाभाऱ्यात महामायेची मूर्ती वस्त्र व दागिन्यांनी मढलेली आहे. त्यामुळे बारकावे समजत नाहीत. आत असलेल्या शिलालेखांचे फोटो काढायला सुद्धा परवानगी मिळाली नाही.

खांबांवर नेहमीच्या शिल्पांखेरीज गौतम बुद्ध दिसल्याने मला आश्चर्य वाटले पण पुजाऱ्याकडे त्याचे उत्तर नव्हते. एक माहिती अशी समजली की गौतम बुद्धाची आई मायादेवी आणि देवी महामाया यांचा संबंध जोडून नंतरच्या काळात हे कोरीवकाम झाले असावे. पण खात्रीशीर माहिती मिळाली नाही. मंदिराच्या आवारात भैरव, पंचमुखी शिव अशीही मंदिरे आहेत.



**महामाया मंदिर**

◆◆◆



पंचमुखी शिवमंदिर, रतनपूर



कार्तिकेय



पंचमुखी शिवलिंग



द्विभुज गणपती




नवसाचे नारळ

# ३०. कलचुरी किल्ला



रतनपूरला चार युगांची नगरीं म्हणून ओळखलं जातं - कृत (सत्य) युगात मणिपुर, त्रेता- माणिकपुर ,द्वापार- हिरापुर आणि कलियुगात रत्नपुर म्हणजेच आजचं रतनपूर ! गंमत अशी की सगळी नावं रत्नांविषयीच आहेत. खूप समृद्ध असावी तेंव्हा...

रतनपूरला माझ्यासाठी आणखी एक आकर्षण होतं - कलचुरींचा किल्ला ! महामाया मंदिराजवळच आहे. बरीच पडझड झाली असली तरी वैभवाच्या खुणा अजून दिसतात आणि परिसरावरून त्याच्या विशालतेचीही कल्पना येते. सिंह दरवाज्यातून आत शिरलं की उजव्या बाजूला कोरीवकाम शिल्लक आहे. तिथले शिलालेख आता रायपूर संग्रहालयात हलवले आहेत. लेखांच्या बाजूला खारी कोरलेल्या दिसतात. (एकूणच या भागात खारींना महत्व असल्याने मंदिराच्या द्वारशाखेतही दिसतात.) देवतांबरोबर नवग्रह, वादक, नर्तकसुद्धा होते.

मग थोड्या मोकळ्या जागेनंतर गणेश दरवाज्यातून प्रवेश आहे. नावानुसार वरच्या भागात गणपती कोरलेला आहे. भिंतीवर सुंदरी, मिथुन शिल्पे सुस्थितीत आहेत. आत गेल्यावर लक्ष्मीनारायण मंदिर आणि जगन्नाथ मंदिर पाहायला मिळतात. मोठे स्नान कुंड (हम्माम ) आणि पुष्करिणीही आहे. मुख्य महालाचे बरेच अवशेष आहेत. याशिवाय इतरत्र भरपूर दगड,शिल्पं विखुरलेली आहेत. एक पडके शिव मंदिरही होते. परिसर अत्यंत स्वच्छ ठेवलेला आहे. खाली हिरवळ,वर निळं आकाश आणि मध्ये हे पडके अवशेष- एक वेगळंच दृश्य होतं ...

◆◆◆




कलचुरी किल्ल्याचे अवशेष




कलचुरी किल्ल्याचे प्रवेशद्वार



सिंह दरवाजा



कलचुरी किल्ल्यातील गणेश दरवाजा



गणेश दरवाज्यावरील कोरीवकाम



पुष्करिणी

वादक



नर्तक



# ३१. रामगढ आणि मेघदूत



रतनपूरहून आता निघाले अंबिकापूरला. सरगुजा जिल्ह्याकडे आणि पुढे पूर्वेला फारसं कुणी जात नाही. पण म्हणूनच मला जायचं होतं ! अंबिकापूरजवळचा रामगढ पाहायचा होता !!

मेघदूत हे कालिदासाचं सुप्रसिद्ध खंडकाव्य ! सहा वर्षांपूर्वी संस्कृत पारंगत (एम,ए.) साठी शिकत असतांना आकंठ प्रेमात पडले कालिदासाच्या! आता हे मेघदूत त्याने रामगिरी पर्वतावर राहणाऱ्या विरही यक्षाला नायक आणि चक्क ढगाला दूत बनवून लिहिलं. यातला रामगिरी म्हणजे नेमका कोणता? यावर विद्वानांमध्ये मतभेद आहेत. नागपूर जवळचा रामटेक असावाअसे आदरणीय संशोधक वा.वि.मिराशी यांनी सप्रमाण दाखवून दिले आहे. उज्जयिनीहून रामटेकला आलेल्या कालिदासाने इथे बसून मेघदूत लिहिले असावे असं मानलं जातं. रामटेकला कालिदास स्मारक आहे. डॉक्टर भावेंनी मेघदूताच्या मार्गावरून विमानाने प्रवास केला तोही रामटेकपासूनच.

पण छत्तीसगढला मात्र रामगिरी म्हणजे त्यांचा रामगढ अशी ठाम समजूत आहे. अगदी शासकीय कार्यालयाची सुद्धा! रामगढ जवळ त्यांनी मेघदूताच्या काव्यपंक्ती लिहिल्या आहेत. कालिदासाचा पुतळाही उभारला आहे.

मी रामटेकही पाहिला आहे आणि आता रामगढ देखील ! शास्त्रशुद्ध मत काहीही असलं तरी काव्यदृष्ट्या मला रामगढच भावला! तिथे गेल्यावर




मेघदूत काव्यपंक्ती




कालीदासाचा पुतळा

सीताबेंगा गुहा





सीताबेंगा गुहा
आणि जोगीमारा गुहा



गुहा



गुहेतील शयनव्यवस्था

मेघदूतातले श्लोक आणि वर्णनं जशीच्या तशी आठवली. दोन गुहा आहेत. इ.स.पूर्व तिसऱ्या ते पहिल्या शतकातल्या असाव्यात. सीताबेंगा गुहेत छान विश्राम करता येईल असे दगडी ओटे आहेत. प्रवेश करतांना मेघदूतातली रामाची पदचिन्हेही आहेत. अशोक कालीन ब्राह्मी लिपीतला एक लेख आहे पण आता जरा खराब झाला आहे.उत्सवाचा आनंदाचा उल्लेख आहे यात. समोर अर्धचंद्राकृती सपाट जागा आहे दोन टप्प्यात. हे सर्वात प्राचीन नाट्यगृह किंबहुना रंगमंदिर असावे असे मानले जाते.

जोगिमारा गुहा फाटकाला कुलूप लावून बंद होती. पण मी गजातून हात आत घालून आणि सीताबेंगा गुहेपाशी वर चढून जोगिमाराचे फोटो मिळवले. जोगिमारात रंगीत गुहाचित्रे आणि एक छोटासा लेख आहे. 'देवदासी' असा उल्लेख प्रथम इथेच मिळाला. सुतनुका देवदासी आणि देवदिन चित्रकार किंवा शिल्पकार यांच्या प्रेमाचा या लेखात उल्लेख आहे. एक मत असं की वाराणसीच्या तरुणाचे प्रेम होते. इथे प्रेमालाप, नृत्यगायन चालत असावं अशी समजूत आणि तशी वर्णनं आहेत. मेघदूतात नीचैः नावाच्या पर्वतांतल्या शैलगृहांचा आणि त्यातल्या शृंगाराचा उल्लेख आहे, त्याची आठवण या गुहा पाहून होते.

वास्तविक या गुहा व्यापारी मार्गावर असल्याने इथे विश्रांती घेण्यासाठी मुक्काम करत असतील. पण इतरत्र जसे धार्मिक लेख मिळतात, तसे इथे नाहीत. दोन्ही लेख सामान्यांच्या आयुष्यासंबंधीच आहेत. काय खरं कुणास ठाऊक, पण एक निसर्गरम्य ठिकाण पाहिल्याचं समाधान मात्र निश्चित मिळतं.

◆◆◆




**जोगीमारा गुहेतील ब्राह्मी लिपीतील शिलालेख**




जोगीमारा गुहेतील चित्रे







भग्नावशेष



# ३२. कौसल्या मंदिर



रामाचा विषय निघालाच आहे तर या निमित्ताने छत्तीसगढची एक वेगळी गंमत पाहूया.

छत्तीसगढ म्हणजे दक्षिण कोसल हे मी सांगितलंच आहे. राजधानी रायपूरपासून २५ किमी वर एक छोटं गाव आहे - चंदखुरी! इथे कौसल्यामातेचं मंदिर आहे. कौसल्येचा जन्म इथे झाला असं समजलं जातं. हे गाव आहे भरपूर तलावाचं आणि मुबलक कमळांचं! एका मोठ्या तळ्याच्या मधोमध हे मंदिर आहे. मंदिराकडे जाणारा पूल हनुमान सेतू म्हणून ओळखला जातो. मी गेले तेंव्हा या मंदिराचा जीर्णोद्धार सुरू होता. हनुमानाचा अति भव्य पुतळा, शोभिवंत कमान, सेतूचे सुशोभीकरण अशी बारा कोटी खर्च करण्याची योजना होती. आता अर्थातच हे काम पूर्ण झाले आहे. 'राम वन गमन मार्ग' ही खास पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आखलेली मोहीम सुरूच आहे. राम खरोखर त्याच मार्गाने गेला की नाही कुणास ठाऊक, पण त्या निमित्ताने वाटेवरच्या गावांचा विकास होत आहे.

हे मंदिर भारतातलं आणि अर्थातच जगातलं एकमेव कौसल्या मंदिर आहे. आठव्या शतकातलं असलं तरी अनेकदा नूतनीकरण झाले आहे. खांबांवर नवीन रंगवलेली चित्रे आहेत- राम, त्याचे बंधू, हनुमान आणि लंका स्वारीतले जांबुवंतासारखे सहकारी, इत्यादी. तळ्यामध्ये समुद्र मंथन आणि शेषशायी विष्णू असे भव्य देखावे आहेत. गाभाऱ्याच्या दोन बाजूंना सरस्वती आणि महाकाली यांच्या मूर्ती आहेत. गाभाऱ्यात कौसल्या आणि तिच्या जवळ राम असे शिल्प आहे. असं म्हणतात की  हे असंच तळ्यात सापडलं आणि मग त्याची प्रतिष्ठापना केली गेली.

जवळच एका झाडाखाली सुषेण वैद्याची बैठी मूर्ती आहे. हा रावणाचा राजवैद्य. याच्याच सांगण्यावरून लक्ष्मणासाठी संजीवनी आणली गेली. असं सांगतात की रावण वधानंतर हा सुषेण रामाबरोबर इथे आला आणि शेवटपर्यंत इथेच राहिला. ही सुद्धा बहुदा एकमेव मूर्ती असावी.

नूतनीकरणानंतरच्या या मंदिराच्या चित्रफिती यू टयूब वर आहेत त्या जरूर पहा.

◆◆◆



कौसल्या मंदिराकडे
हनुमान सेतू



अमृतमंथन



शेषशायी विष्णू



रामासह कौसल्या



सुषेण वैद्याचा पुतळा






खांबांवरील रंगीत चित्रे
राम व त्याचे बंधू



# ३३. दंडकारण्य



माझा प्रवास रामगढकडून अंबिकापूरकडे होता तेव्हा सहज बोलताना कळलं की वाटेत महेशपूरला काही भग्न मंदिरे आहेत. गूगलची तुटपुंजी मदत आणि स्थानिकांकडून मिळालेली त्रोटक माहिती यांसह जायचं ठरवलं. माझ्या गाडीचा चालक फारच चांगला होता. मला नेमके काय बघण्यात रस आहे हे एव्हाना त्याला छान समजले होते आणि हे शोधाशोधीचं धाडस करण्याची त्याची तयारी होती. बराच खटाटोप करून आम्ही एकदाचे सूर्यास्ताच्या आत पोचलो महेशपूरला.

रेण किंवा रेणू नदीच्या परिसरात ही शैव आणि वैष्णव मंदिरे आहेत. ८व्या ते १३व्या शतकातली कलचुरी राजवटीतली असावीत. २००८-२००९ मध्ये इथे उत्खनन केले गेले. पण अजूनही कित्येक अवशेष इतस्ततः विखुरलेले आहेत. मंदिर परिसरात माझ्यासोबत फक्त काही शेळ्या आणि काही म्हशी होत्या. महुआची भरपूर झाडं होती आसपास. तसंही या भागात झाडी खूप आहे कारण हाच पूर्वीचा दंडकारण्याचा भाग समजला जातो आणि महेशपूर हे त्याचे प्रवेशद्वार असावे.रामसीता इथूनच पुढे गेले असं मानतात. इथली रेण नदी म्हणजे जमदग्नी ऋषींची पत्नी आणि भगवान परशुरामांची माता रेणुकादेवी अशी स्थानिक समजूत आहे.

वामन, वराह, नृसिंह या विष्णूच्या अवतारांची अतिशय रेखीव शिल्पं पाहायला मिळाली. नेहमी वराहाच्या पावलाखाली नागराजाचा फणा दाखवला जातो. इथे मस्त कमळावर पाय ठेवला होता त्याने. एका देवालयाच्या द्वारात हत्तींची रांग सुरेख कोरलेली होती. बाजूच्या एका पडक्या देवालयात खांबावर कोरलेली मनुष्याकृती 'शमन' म्हणजे जादूटोणा करून उपचार करणाऱ्या मांत्रिकाची समजतात. परिसरातल्या एका पडवीत इतरत्र सापडलेली काही शिल्पं भिंतीला टेकवून ठेवलेली दिसली.

पुन्हा नेहमी भेडसावणारे तेच ते प्रश्न !- अन्न -वस्त्र-निवारा या प्राथमिक गरजा सुद्धा सगळयांच्या भागल्या नाहीत, तिथे कसं नि काय काय जतन करणार या देशात?? इतकं सगळं बघण्यासारखं असल्यावर एक जन्म कसा पुरणार?? अनेक जन्म मिळाले तरी मागच्या जन्मातलं लक्षात कसं राहणार??.... फक्त प्रश्न ..उत्तरं नाहीत...

◆◆◆



शिवमंदिर



विष्णुमंदिर, महेशपूर



वामनावतार





भग्न शिर



वराह अवतार





अवशेष



# ३४.अजब गजब मैनपाट 

अंधार पडायच्या आत दण्डकारण्यातून बाहेर पडून अंबिकापूरला पोचले. अंबिकापूरला सर्वात स्वच्छ गाव असा बहुमान मिळालेला आहे. अर्थात माझ्या पुणेरी शनवारपेठीय नजरेला कचरा दिसलाच. दुसऱ्या दिवशी सकाळी मैनपाटला जायचं होतं. हे छत्तीसगढचं सिमला आहे– थंड हवेचं ठिकाण ! उंचावर विस्तीर्ण पठार आहे. हा भाग भरपूर खनिज संपत्तीचा, विशेषतः बॉक्साईट ! तसं तर बस्तर भागातही लोह, मॅंगेनीज, क्वार्ट्झ, चुनखडक भरपूर आहेत. इथली मातीही वेगळी आहे. हिरवट रंगाची नि चिकट, तिला मैन माती असंच म्हणतात. ती केसांसाठी उत्तम असं कळलं. पुढे मी हिंडले तेंव्हा एका वृद्ध स्त्रीने दहा रुपयांना एक किलो माती घ्यायला लावली मला! इथे उंचावरून कोसळणारे धबधबे, धुकं पांघरलेले दरी–डोंगर, हिरवीगार शेतं असं मस्त निसर्ग सौन्दर्य अनुभवायला मिळतं.

या भागात मला काही वेगळ्या गंमती अनुभवायच्या होत्या.

‘उल्टा पानी’ किंवा ‘बिसर पानी’ हा खरं तर दृष्टिभ्रमाचा प्रकार! पण मला सताड डोळे उघडे ठेवून, चारचार वेळा बघून सुद्धा खोटा म्हणता येईना ! गंमत अशी आहे की स्थानिक लोकांनी ओढ्यातून शेतीसाठी पाट काढले आहेत. पण पाणी गुरुत्वीय नियम डावलून खालून वर वहात येतांना दिसतं. माझ्या शास्त्रीय बुद्धीला हे अजिबात पटत नव्हतं. मी खाली उतरून मूळ ओढा पाहिला आणि मग प्रवाहात एक पान टाकलं आणि कडेकडेने चालायला सुरुवात केली. मी चढून वर आले आणि पाण्याबरोबर पान सुद्धा ! हे परत परत करूनही त्यात दोष काढता येईना. शिवाय गाडी न्यूट्रलगिअर मध्ये टाकल्यावर माथ्यावर मागे जात होती ते वेगळेच ! वास्तविक सभोवतालच्या भूभागाच्या रचनेमुळे असे भास होतात. क्षितिज दिसत नसेल तर उंच सखलपणा नीट कळत नाही. उतार असूनही चढ वाटतो. सगळं माहित असूनही मी ही मज्जा अनुभवलीच.

दुसरा प्रकार होता – ‘टिनटिनी पत्थर’. ६.५ फूट लांब आणि ३ फूट रुंद असा दगड वेगवेगळे आवाज काढतो. कमीअधिक पोकळ असल्यामुळे त्यावर दुसऱ्या छोट्या दगडाने आघात केल्यावर छान आवाज येतात. मारून मारून बिचाऱ्या दगडाला पोचे आलेत ! तिथे एका म्हातारबाबांनी मला प्रात्यक्षिक दिलं ! त्या दगडाची एक मजेशीर गोष्ट आहे. एक परी रोज रात्री येऊन नृत्य करायची. संगीताचा



मैनपाटचा नेत्रसुखद निसर्ग





मनमोहक हिरवाई

आवाज कुठून येतो ते गावकऱ्यांना कळत नसे. आळीपाळीने जागून पहारा करत एकदा लोकांनी पाहिले, पण त्याच क्षणी ती दगड बनली. तोच हा दगड. काहींच्या मते आकाशातून हा महाकाय उल्कापाषाण आदळला. त्यातील वायू निघून गेल्याने आत लहान मोठ्या पोकळ्या तयार झाल्या म्हणून असे आवाज येतात. गावातले एक निवृत्त शिक्षक त्यावर अधिक संशोधन करत आहेत.

तिसरी अजब गोष्ट होती- 'जलजली' ! थोडा दलदलीचा भाग आहे. पण त्याचा पृष्ठभाग जरा घट्ट आहे. त्यामुळे तिथे उड्या मारल्या की सर्कशीतला विदूषक ताणलेल्या जाळ्यावर उड्या मारतो ना तसं वाटतं! तिथे पोचण्यासाठी पायऱ्या उतरून जरा चालावं लागतं. पण मी नवखी आहे असं पाहून घोडेवाल्यांनी त्यांची आवश्यकता मला पटवून दिली. मग काय गेले घोड्यावर स्वार होऊन आणि लहान मुलीसारख्या उड्या मारून त्या घोडेवाल्यालाच चित्रफीत काढायला लावली !

◆◆◆



थरथरणारे जलजली मैदान



घोड्यावरून जलजली रपेट



उल्टा पानी



टिनटिना पत्थर



कॉमन जेझबेल



ब्लॅक पिरो

मैन-माती विक्रेतीसह



# ३५. मैनपाटचे तिबेटी

मैनपाटचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथे तिबेटी लोक मोठ्या प्रमाणात आहेत. १९६२ च्या युद्धानंतर जवळपास दीड हजार कुटुंबं इथे आसऱ्याला आली. तत्कालीन सरकारच्या कृपेने त्यांना ३००० एकर जमीन दिली गेली. आज ते लोक शेती करतात, चटया-शाली विणतात. अगदी छान स्थिरावले आहेत. रस्त्यालगतच्या एका तिबेटी उपाहारगृहात शिरून मालकाशी खूप गप्पा मारल्या. पूर्वी लडाखला मी 'गुरगुर चाय' चा आस्वाद घेतला होता. इथे मिळेल का विचारल्यावर त्याला फारच आनंद झाला. उत्साहाने त्याने बनवून दिला. लगेच मुलाला बोलावून आणले. त्यानेही मला त्याचे बटाट्याचे उत्पादन आणि इतर शेती दाखवली. बोलताना समजले की प्रत्येक कुटुंबातला एक तरी मुलगा आपल्या सैन्यात आहे. जरा अतिशयोक्ती वाटली, पण ठीक आहे. त्यांची संस्कृती, रीतिरिवाज ते इथे पाळतात. त्यांच्यासाठी बौद्ध मठ आहेत इथे. त्यांच्या भिंतींवर बाहेरून बुद्ध आणि बौद्ध देवतांच्या छोट्या प्रतिमा हजारोंच्या संख्येने लावलेल्या दिसल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी मला इथल्या सर्वात मोठ्या मठातली प्रार्थना पाहता येईल अशी व्यवस्था त्याने करून दिली. मी पहाटे उठून गेले तर अजून कोरोना परिणामामुळे सगळं निवांत होतं ! पण मिळाली पाहायला.

नंतर टायगर पॉईंट आणि फिश पॉईंटचे धबधबे पाहिले. फुलपाखरं मनसोक्त बागडतांना दिसली. वाटेत एक आणखी कला पाहायला मिळाली. लाकडावरचे कोरीवकाम! नैसर्गिक ओंडक्यांवर अप्रतिम कलाकारी केली होती. शिवाय इतर शिल्पं, टेबल खुर्च्या हे ही ! जेवायला थांबले तिथे तर खुद्द मालकाने केलेल्या कविता – खरं तर चारोळ्या वाचायला मिळाल्या! अचानक कधी कुठे किती झाकली माणकं सापडतील याचा नेम नाही! मला आवडलेल्या दोन इथे देते...

१. ज़िन्दगी जीनेके लिये पडी है, तुम्हे आजमानेकी पडी है।
आओ बासी रिवायतें बदल दे हम, बताओ तो जरा क्या ये बात बडी है ?

२.जमीनपर बदलते मौसमसे आसमान हैरान है।
क्या ये वही जमीन है जिस पर वो मेहेरबान है ?

◆◆◆



छोटे भिख्खू



मठातील बुद्धप्रतिमा

तिबेटी मठ





मंत्र पताका



टायगर पॉइंट



तिबेटी उपहारगृहात मालकाबरोबर




तिबेटी फलक



तिबेटी गुरगुर चाय



तिबेटी मठ





लाकडी कोरीवकाम आणि मूर्ती



# ३६. अमरकंटक आणि सांगता



आता मैनपाटहून परतायचं होतं. पण आल्या वाटेनं सरळ येण्यात काय मजा? स्मार्ट फोनच्या बाकी गोष्टी वापरल्या नाहीत तरी गूगलचं नकाशाचं खेळणं मी अगदी मनापासून वापरते! त्यामुळेच माझ्या लक्षात आलं की आता मला अम्बिकापूरवरून जाण्याची गरज नव्हती आणि जर दुसरा रस्ता घेतला तर जितका वेळ मला बिलासपूरला जायला लागणार होता, तितक्याच वेळात मी अमरकंटकला जाऊ शकत होते. वा ! डोक्यात चक्रं फिरल्याबरोबर लगेच चक्रधारीशी बोलले. त्याची तयारी होती. अमरकंटक जरी मध्य प्रदेशमध्ये येत असलं तरी वेगळा परवाना लागणार नव्हता. पेट्रोल मी भरायचं असं ठरलं आणि निघालो. त्याने मालकाला हा बदललेला बेत कळवला आणि एकच गोंधळ उडाला. रस्ता जंगलातून आहे, परतायला अंधार होईल, नक्षलवादी वगैरे भीती त्याने माझ्या सहलीच्या आयोजिकेला घातली. तिचे घाबरून मला फोनवर फोन ! मी शांतपणे सांगितलं की मी काय करते आहे ते मला पूर्ण माहित आहे. ही माझी एकटीची सहल आहे आणि त्यातले निर्णय फक्त मीच घेणार. परिणामांची जबाबदारी माझी आहे. तिने काळजी करण्याचे कारण नाही.

मग मस्त प्रवास सुरू झाला. जंगलातून असला तरी असा काही निबिड अरण्यातून वगैरे नव्हता रस्ता. छान गप्पा मारत आम्ही अमरकंटकला पोचलो.

नर्मदेचा उगम पाहिला. जवळच कलचुरी राजवटीतल्या मंदिरांचा एक समूह आहे. तो बघितला. आठव्या शतकापासूनची मंदिरे आहेत इथे. नर्मदेच्या उगमापाशी खुद्द शंकराचार्यांनी सूर्यकुंड बांधून घेतलं. पाताळेश्वर मंदिरात शिव लिंगाची स्थापनाही त्यांनी केली. नंतर कर्णराज कलचुरीने अकराव्या शतकात मंदिर नीट बांधले. या पाताळेश्वर मंदिराचा गाभारा मंडपापेक्षा पाच फूट खाली खोल आहे, बहुतेक शिवमंदिरांसारखा! पंचमठ मंदिर हा गोंड राजवटीतला पाच मंदिरांचा समूह कला स्थापत्य दृष्ट्या सामान्य आहे.

बाघेल राजांनी बांधलेलं चौदाव्या शतकातलं एक वेगळंच मंदिर दिसलं. नेहमी पूर्व-पश्चिम असतात देवळं, पण हे उत्तरेकडे तोंड करून होतं. जवळच वाहणाऱ्या जूहीला नदीच्या नावाचं होतं. केशवनारायण नावाने ओळखलं जाणारं विष्णूचं मंदिर वैशिष्ट्यपूर्ण आहे. दोन गाभारे, दोन अंतराळ पण मंडप मात्र एकच सामायिक ! अकराव्या शतकात कलचुरींनी बांधलं. मंडपावर फांसणा पद्धतीचं छप्पर आहे.



अमरकंटक मंदिरे



नर्मदा उगम–सूर्य कुंड



शिखरावर सिंह–गज



जूहिला मंदिर



केशव नारायण



शिव मंदिर

जरा बाजूला कर्णमंदिर आहे. महाभारतातल्या कर्णाशी काहीच संबंध नाही. कर्ण कलचुरीने बांधलेल्या या मंदिराचा वेगळेपणा म्हणजे एकाच चौथऱ्यावर तीन स्वतंत्र गाभारे आहेत. सगळ्यात शिवलिंगेच होती. कदाचित एक सामायिक मंडप बांधायचा असेलही, कोण जाणे.. अशी त्रि-आयतन मंदिरं फारशी दिसत नाहीत.

मावळतीच्या सोनेरी किरणांत ही लाल मंदिरं फार सुरेख दिसत होती. पण त्यांत गुंतून रहाणे शक्य नव्हते. बिलासपूरला पोहोचेपर्यंत अंधार झाला होता आणि त्यात पाऊसही ! ती पण वेगळीच मजा! दुसऱ्या दिवशी रायपूरला संग्रहालयाला परत एक भेट देऊन सरळ विमानतळ गाठला परतण्यासाठी! अर्थात येतांना महुआचे लाडू, लोणचं, मुरांबा, कुकीज, सरबतासाठी अंबाडीच्या फुलांची पावडर, केसांसाठी मैनपाटची माती आणि या सगळ्यांपेक्षा मोलाच्या अशा खूप खूप आठवणी घेऊन परतले...

**अशी ही छत्तीसगढी गाथा छत्तीस लेखी सुफळ संपूर्ण!**

**उतणार नाही, मातणार नाही, फिरण्याचा वसा टाकणार नाही !!!**

◆◆◆

**रचलेले अवशेष**



**कलचुरी मंदिराकडे**



**पंचमठ मंदिर**





**कलचुरी मंदिर समूह**



## डॉ. नीलिमा थत्ते-केळकर

जन्म- १९६२. पुण्यातच वास्तव्य.
शिक्षण - एम्.बी.बी.एस्.,
एम्.ए. इंडॉलॉजी (भारतीय विद्या पारंगत),
एम्.ए. संस्कृत (संस्कृत पारंगत)
१९८७-२०१२ पंचवीस वर्षे पिंपरी चिंचवड येथे बालरोग तज्ज्ञ म्हणून काम.
नंतर स्वेच्छा निवृत्ती.
हौस म्हणून पक्षी, प्राणी, वनस्पती, आकाशातील ग्रह-तारे यांचा अभ्यास.

लेखन -
वर्तमानपत्रांतून पक्षी, सूर्यग्रहण, उल्कावर्षाव, गुरु, शुक्र यांविषयी लेख.
मुलांसाठी मुलांच्या मासिकात लिहिलेल्या पक्षीविषयक लेखमाला 'कसा मी असा मी' आणि 'आगळा मी वेगळा मी' या खूप लोकप्रिय झाल्या.
२०१५ पासून विपुलश्री मासिकात लेखमाला लिहिल्या. 'पूर्व अपूर्व'- (आसाम अरुणाचल सहलीविषयी), 'भग्न काही जीवघेणे'- (पुरातन मंदिरे व अवशेषांविषयी), 'दृक् श्राव्य ऋक् काव्य' (ऋग्वेदातील सूक्तांबद्दलच्या या मालिकेस प्रभाकर वैशंपायन पुरस्कार), 'आमचो छत्तीसगढ' (छत्तीसगढ सहल) .
२०२२ महाराष्ट्र टाईम्स मधे- 'कथाख्यान' सदर